सत्यमेव जयते

# भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी यावरील संपादणूक लेखापरीक्षा अहवाल

SUPREME AUDIT INSTITUTION OF INDIA

लोकहितार्थ सत्यनिष्ठा

Dedicated to Truth in Public Interest

**महाराष्ट्र शासन**

**वर्ष 2023 चा अहवाल क्र. 4**

# भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
# यांचा
# इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी यावरील संपादणूक लेखापरीक्षा अहवाल

**महाराष्ट्र शासन**

**वर्ष 2023 चा अहवाल क्र. 4**

## अनुक्रमणिका



| | संदर्भ | |
|---|---|---|
| | परिच्छेद | पृष्ठ क्र. |
| **उपोद्घात** | | v |
| **कार्यकारी सारांश** | | vii |
| **प्रकरण 1**<br>**प्रस्तावना** | | |
| थेट लाभ हस्तांतरण | 1.1 | 1 |
| थेट लाभ हस्तांतरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय सहभाग | 1.2 | 1 |
| महाराष्ट्रात थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी | 1.3 | 2 |
| इतर मागास बहुजन कल्याण विभागाची संघटनात्मक संरचना | 1.4 | 2 |
| लेखापरीक्षणाची उद्दिष्टे | 1.5 | 3 |
| लेखापरीक्षण निकष | 1.6 | 3 |
| लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि कार्यपद्धती | 1.7 | 3 |
| अभिस्विकृती | 1.8 | 5 |
| **प्रकरण 2**<br>**थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी** | | |
| महाराष्ट्रामधील थेट लाभ हस्तांतरण प्रणाली | 2.1 | 7 |
| प्रणालीचे दस्तऐवज तयार न करणे | 2.2 | 12 |
| माहिती तंत्रज्ञान सुरक्षा | 2.3 | 12 |
| थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी | 2.4 | 13 |
| योजनेचे संनियंत्रण | 2.5 | 30 |

| परिशिष्टे | संदर्भ | |
|---|---|---|
| | परिशिष्ट | पृष्ठ क्र. |
| शिष्यवृत्ती अर्ज आणि संवितरणाचा तपशील | 2.1 | 35 |
| 20 किंवा त्यापेक्षा जास्त अर्जांना जोडलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकांची उदाहरणात्मक प्रकरणे | 2.2 | 36 |
| देयक निर्मितीच्या वेळी फर्स्ट इन फर्स्ट आऊट पद्धतीचे उल्लंघन दर्शविणारी उदाहरणात्मक प्रकरणे | 2.3 | 38 |
| इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत देयक निर्मितीस लागलेला कालावधी | 2.4 | 41 |
| इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत केंद्रीय संचय खात्यात निधी जमा होण्यास लागलेला कालावधी | 2.5 | 42 |
| इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत विद्यार्थी/महाविद्यालयांच्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम हस्तांतरित करण्यास लागलेला कालावधी | 2.6 | 43 |
| इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे शैक्षणिक वर्षासाठीचे प्रदान पुढील वर्षात विभागले | 2.7 | 44 |

# उपोद्घात

31 मार्च 2021 रोजी संपलेल्या वर्षासाठीचा हा अहवाल भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 151 अंतर्गत, महाराष्ट्राच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

2018-19 ते 2020-21 या कालावधीसाठीच्या ह्या अहवालात "इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी" यावरील संपादणूक लेखापरीक्षेचे निष्कर्ष समाविष्ट आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी जारी केलेल्या लेखापरीक्षणाच्या मानकांनुसार लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे.

**टिप: मूळ इंग्रजी अहवालावरुन अनुवादित; शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पहावा.**

# कार्यकारी सारांश

# कार्यकारी सारांश

## *इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी*

शासनाकडून लोकांना चांगले व वेळेत लाभांच्या वितरणाची सुनिश्चिती करण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण हा भारत सरकारचा एक प्रमुख सुधारणा उपक्रम आहे. लाभार्थ्यांना लाभांचे आणि अर्थसहाय्याचे थेट हस्तांतरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 2018 मध्ये एक इलेक्ट्रॉनिक व्यासपीठ (प्लॅटफॉर्म) म्हणून थेट लाभ हस्तांतरण प्रणाली सुरू केली. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप ही थेट लाभ हस्तांतरण प्रणालीमध्ये राबविण्यात येणारी एक महत्त्वाची योजना आहे आणि संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आहे.

ऑनलाइन थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे महाराष्ट्र शासनाच्या 10 विभागांनी वर्ष 2018-19 ते 2019-20 दरम्यान ₹ 7,227.58 कोटी शिष्यवृत्तीपोटी संवितरित केले होते. ऑनलाइन पद्धतीने शिष्यवृत्तीचे संवितरण हे महाराष्ट्र शासनाचा अग्रगण्य उपक्रम असल्याने आणि मोठ्या प्रमाणात रकमेच्या संवितरणामुळे थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे शिष्यवृत्त्यांचे संवितरण ह्याचे संपादणूक लेखापरीक्षण करण्यात आले.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शिष्यवृत्तीवर ₹ 2,751.47 कोटी (38.07 *टक्के*) एवढा मोठा खर्च संवितरीत केल्याने शिष्यवृत्ती योजनेतील थेट लाभ हस्तांतरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी निवड करण्यात आली. दोन योजना, म्हणजे इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी केंद्र पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती आणि विमुक्त जाती भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य अनुदानित मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती यांची संपादणूक लेखापरीक्षणात तपशीलवार छाननीसाठी निवड करण्यात आली.

महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी लिमिटेड, या महाराष्ट्र शासनाच्या कंपनीने विकसित केलेल्या महाराष्ट्र राज्य थेट लाभ हस्तांतरण आणि सेवा (महाडीबीटी) या पोर्टलद्वारे शिष्यवृत्तींचे संवितरण करण्यात येते.

(i) शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरणाची अंमलबजावणी करण्यासाठी बिझनेस रि-इंजिनीअरींग प्रक्रिया प्रभावी होती किंवा कसे; (ii) थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी, व्यवसाय नियमांचे नकाशन प्रभावीपणे केले गेले किंवा कसे आणि (iii) सामान्य आणि ॲप्लीकेशन नियंत्रणे पुरेशी होती किंवा कसे ह्याचे निर्धारण करण्यासाठी 2018-19 ते 2020-21 ह्या कालावधीसाठी संपादणूक लेखापरीक्षण करण्यात आले.

लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की, प्रणालीच्या दस्तऐवजीकरणाची कोणतीही तरतूद केली नव्हती. प्रणालीची गुणवत्ता तसेच भविष्यातील देखरेख सुनिश्चित करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान प्रणालीचे तांत्रिक दस्तऐवजीकरण आवश्यक असल्याने ***शासनाने हे सुनिश्चित केले पाहिजे की प्रणाली दस्तऐवज प्राप्त केले जातील व अभिलेख्यावर ठेवले जातील, ज्यामुळे भविष्यातील प्रणालीच्या देखभालीस मदत होईल.***

वेब आधारित ॲप्लीकेशन्स (उपयोजने) ही सुरक्षित आणि ज्या हॅक किंवा तडजोड होण्यापासून आणि भेद्यतेपासून मुक्त आहेत ह्याची खात्री करण्यात सुरक्षा लेखापरीक्षा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की, ऑगस्ट 2020 मध्ये केलेल्या शेवटच्या प्रमाणनानंतर एक वर्षापेक्षा जास्त अवधी उलटून गेल्यानंतर देखील महाडीबीटी पोर्टलचे सुरक्षा प्रमाणीकीकरण केले गेले नव्हते. **शासनाने म्हणून, *विशिष्ट कालावधीनंतर ॲप्लीकेशन्सची सुरक्षा लेखापरीक्षा* न चुकता *केली जात आहे ह्याची सुनिश्चिती करावी.***

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, ऑनलाइन प्रणालीमध्ये व्यवसाय नियम योग्यरित्या नकाशीत केले गेले नव्हते. ह्याच्या परिणामी, अर्जदाराने मिळकतीचा दाखला आणि जातीचा दाखला ह्यासारखी आवश्यक कागदपत्रे अपलोड न करूनही अर्जावर प्रक्रिया केल्याची प्रकरणे घडली आहेत. तसेच, व्यवसाय नियमांचा भंग करीत नंतर मंजूर झालेल्या अर्जांना देयक तयार करतेवेळी प्राधान्य दिले गेले. शिवाय, व्यवसाय नियमांचे अयोग्य नकाशन केल्याने शैक्षणिक वर्ष 2018-19 आणि 2019-20 मध्ये संस्था/विद्यार्थी यांना ₹ 53.41 कोटींची अतिरिक्त शिष्यवृत्ती संवितरीत करण्यात आली. ***म्हणून शासनाने हे सुनिश्चित करावे की प्रणाली आवश्यकतेनुसार कार्य करते आहे याची खात्री करण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यवसाय नियम योग्यरित्या नकाशित केले आहेत व काटेकोरपणे तपासले आहेत. शासनाने चुकीचे प्रदान टाळण्यासाठी प्रोग्राम चेंज नियंत्रणे पुरेशी आहेत याचीही खात्री करावी.***

संपूर्ण थेट लाभ हस्तांतरण प्रणाली जरी ऑनलाइन होती तरी, योजना-विशिष्ट बँक खात्यात निधीची प्रदाने आणि मंजुरीसाठी कोषागारामध्ये देयके सादर करणे ऑफलाइन पद्धतीने सुरू राहिले, ज्यामुळे मानवी प्रक्रियेशी संबंधित जोखीमांना प्रणाली खुली राहिली. ***शासनाने म्हणून थेट लाभ हस्तांतरण प्रणालीमधील रि-इंजिनीअरिंग आणि महाडीबीटी प्रणालीशी एकात्मकीकरणासाठी विद्यमान मानवी प्रक्रियांचा आढावा घ्यावा.***

संवितरणासाठी मंजूर झालेल्या शिष्यवृत्त्या या शिष्यवृत्त्यांचे संवितरण न होणे आणि देयक-निर्मितीपासून अर्जदार/महाविद्यालयाला अंतिम जमा (क्रेडिट) होण्यापर्यंत शिष्यवृत्ती वितरणामधील विलंब अशा महत्त्वाच्या बाबींनी ग्रासित होत्या. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की बऱ्याच वेळा अर्जदार ज्या वर्षासाठी पात्र होता, त्याच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्तीच्या रकमेचे संवितरण केले जात होते. ह्या त्रुटी सूचित करतात की ***शासनाने थेट लाभ हस्तांतरण प्रणालीचा वापर करून शिष्यवृत्तीच्या संवितरणासाठी लागणारा कालावधी कमी करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.***

महाडीबीटी प्रणालीमध्ये विदांची फेर-पडताळणी प्रणालीचा अभाव होता कारण ती राज्य शासनाच्या इतर प्रणालींशी जोडली गेली नव्हती ज्यामुळे विदांच्या विश्वासार्हता सुधारण्यात मदत झाली असती. बायोमॅट्रिक उपस्थिती प्रणाली देखील महाडीबीटी प्रणालीबरोबर एकत्रित केली नव्हती. ***महाडीबीटीमधील विदाची विश्वासार्हता सुधारण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांच्या बायोमॅट्रिक उपस्थितीसह विविध शासकीय संस्थांमध्ये विदा एकत्रीकरण सुनिश्चित करावे.***

# प्रकरण 1

# प्रस्तावना

# प्रकरण 1

# प्रस्तावना

## 1.1 थेट लाभ हस्तांतरण

शासनाकडून लोकांना चांगल्या व वेळेत लाभांच्या वितरणाची सुनिश्चिती करण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण हा भारत सरकारचा एक प्रमुख सुधारणा उपक्रम आहे. मजुरीची प्रदाने, इंधन अर्थसहाय्य, अन्नधान्य अर्थसहाय्य आणि शिष्यवृत्त्या यासारखे लाभ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याच्या प्रक्रियेत एक आमूलाग्र बदल झाला आहे, ज्यायोगे गळती थांबवून आर्थिक समावेशनात वृद्धी होईल. थेट लाभ हस्तांतरणाची उद्दिष्टे **आलेख 1.1** मध्ये दर्शविली आहेत.

**आलेख 1.1: थेट लाभ हस्तांतरणाची उद्दिष्टे**

- लाभार्थ्यांना निधी हस्तांतरण करताना पारदर्शकता निर्माण करणे
- लाभार्थ्यांची अचूक निश्चिती आणि लक्ष्यीकरण
- सेवांचा लाभ घेण्यासाठी मोठा अंतर्भाव आणि सुलभतेची खात्री करणे
- लाभ वितरण प्रक्रियेतील गळती रोखणे
- दलाली (रेंट सिकिंग) रोखणे, मध्यस्थ/दलालांचे उच्चाटन
- रि-इंजिनीअरींगद्वारे शासकीय प्रक्रियांमधील सुधारणांत सुलभता आणणे
- योजना वितरण प्रक्रियेतील कार्यक्षमता वाढविणे

*स्रोत: थेट लाभ हस्तांतरण उपक्रम (मिशन), कॅबिनेट सचिवालय, भारत सरकार*

## 1.2 थेट लाभ हस्तांतरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय सहभाग

थेट लाभ हस्तांतरणाच्या अंमलबजावणीसाठी प्रमुख आवश्यकता खालीलप्रमाणे होत्या:

- राज्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण कक्षाची स्थापना करणे जे लाभार्थ्यांसह योजनांच्या संपूर्ण माहितीचे निर्धारण, थेट लाभ हस्तांतरण लागू होणाऱ्या योजनांची निश्चिती व विश्लेषण, निश्चित केलेल्या योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरणाचा धोरणात्मकरित्या अंगीकार आणि थेट लाभ हस्तांतरण चौकटीमध्ये योजनांच्या अंमलबजावणीच्या स्थितीचे संनियंत्रण करणे.
- लाभार्थींचे डिजीटायझेशन, योजना व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे व विशिष्ट ओळख प्राधिकरणाशी (यूआयडीएआय) एकात्मिकरण करणे, सेंट्रल आयडेंटिटिज डेटा रिपॉझिटरी, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस), कोषागार

प्रणाली, आणि एन.पी.सी.आय-आधार मॅपरसाठी बँका आणि नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एन.पी.सी.आय) यांचा समावेश असलेल्या तंत्रज्ञानाचे सक्षमीकरण करणे.

- मानकीकरण चाचणी आणि गुणवत्ता प्रमाणन संचालनालय किंवा संचालनालयाद्वारे नियुक्त अभिकरणांकडून तपासणी केलेल्या भारत सरकारच्या संकेतस्थळांसाठी (वेबसाईट्स) मार्गदर्शक तत्त्वे, वेबसामग्री प्रवेशयोग्यता मार्गदर्शक तत्त्वे आणि सुरक्षितता यांचे अनुपालन करणाऱ्या तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.

## 1.3 महाराष्ट्रात थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी

महाराष्ट्रात, महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी लिमिटेड, या शासकीय कंपनीने विकसित केलेल्या महाराष्ट्र राज्य थेट लाभ हस्तांतरण आणि सेवा (महाडीबीटी) या पोर्टलद्वारे शिष्यवृत्तींचे संवितरण करण्यात येत होते व ते ऑगस्ट 2018 पासून कार्यरत होते.

महाराष्ट्र शासनाचे दहा विभाग विद्यार्थ्यांना आणि संस्थांना शिष्यवृत्तीचे संवितरण करीत होते आणि ऑनलाइन थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे 2018-19 ते 2019-20 दरम्यान ₹ 7,227.58 कोटी रकमेचे संवितरण करण्यात आले. इतर मागास बहुजन कल्याण विभाग[1], महाराष्ट्र शासन यांनी 2018-19 ते 2019-20 दरम्यान शिष्यवृत्त्यांवर सर्वाधिक खर्च, ₹ 2,751.47 कोटी (38.07 *टक्के*) केला होता. म्हणून, शिष्यवृत्ती योजनेतील थेट लाभ हस्तांतरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाची निवड करण्यात आली होती.

## 1.4 इतर मागास बहुजन कल्याण विभागाची संघटनात्मक संरचना

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रमुख, प्रधान सचिव होते. प्रधान सचिवांना पुणे येथील संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग सहाय्य करतात, ज्यांच्याकडे आहरण व संवितरण अधिकाऱ्याचे अधिकार होते. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्याअंतर्गत सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सह-संचालकांच्या अध्यक्षतेखालील नागपूर, नाशिक, पुणे, औरंगाबाद आणि अमरावती अशी पाच क्षेत्रे आहेत. सह-संचालकांना जिल्हा स्तरावरील सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामधील सहाय्यक आयुक्त सहाय्य करतात.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती योजनांना ऑनलाइन मंजूरी देण्याची जबाबदारी सहाय्यक आयुक्तांकडे होती.

---

[1] विमुक्त जाती भटक्या जमाती विभाग हा सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामधून मार्च 2017 मध्ये वेगळा करण्यात आला, ज्याचे नाव मार्च 2020 मध्ये बदलून इतर मागास बहुजन कल्याण विभाग असे करण्यात आले

## 1.5 लेखापरीक्षणाची उद्दिष्टे

संपादणूक लेखापरीक्षणाची उद्दिष्टे खालील गोष्टींचे मूल्यांकन करणे हे होते :

- शिष्यवृत्ती योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरणाची अंमलबजावणी करण्यासाठी बिझनेस रि-इंजिनीअरींग प्रक्रिया प्रभावी होती किंवा कसे;
- थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी, व्यवसाय नियमांचे नकाशन प्रभावीपणे केले गेले किंवा कसे, आणि
- सामान्य आणि ॲप्लीकेशन नियंत्रणे पुरेशी होती किंवा कसे.

## 1.6 लेखापरीक्षण निकष

लेखापरीक्षणाचे निष्कर्ष खालील निकषांवर आधारित होते:

- शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीबाबत भारत सरकारची मार्गदर्शक तत्त्वे आणि आदेश;
- राष्ट्रीय विज्ञान सूचना केंद्राने भारत सरकारच्या संकेतस्थळांसाठी जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे; आणि
- थेट लाभ हस्तांतरण प्रकल्पासंबंधी महाराष्ट्र शासनाचे आदेश/सूचना

## 1.7 लेखापरीक्षणाची व्याप्ती आणि कार्यपद्धती

इतर मागास बहुजन कल्याण विभाग आठ थेट लाभ हस्तांतरण योजना राबवित होते (एक योजना केंद्राने पुरस्कृत केली होती आणि सात योजनांना राज्याने निधी दिला होता). आठ थेट लाभ हस्तांतरण योजनांपैकी 2018-19 ते 2019-20 या कालावधीत सर्वाधिक खर्च (₹ 1,827.21 कोटी) असलेल्या दोन योजना, म्हणजेच इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांकरीता केंद्र पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना आणि विमुक्त जाती भटक्या जमाती विद्यार्थ्यांकरीता शासन अनुदानित मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना, यांची निवड करण्यात आली.

राज्यातील 36 पैकी नऊ जिल्ह्यांचीही लेखापरीक्षण छाननीसाठी निवड करण्यात आली होती. निवडलेल्या नऊ जिल्ह्यांपैकी सात जिल्हे म्हणजे अहमदनगर, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, पुणे, आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्ये 2018-19 ते 2019-20 या वर्षांसाठी निवडलेल्या दोन शिष्यवृत्ती योजनांच्या संदर्भात सर्वाधिक वाटप करण्यात आले होते, तर उर्वरित दोन जिल्हे, म्हणजे गडचिरोली आणि नंदुरबार हे दुर्गम आणि मागासलेले जिल्हे होते. शिष्यवृत्ती अर्जांच्या ऑनलाइन छाननीसाठी या नऊ जिल्ह्यांतील चार श्रेणींमधील[2] प्रत्येकी 10 संस्थांची निवड करण्यात आली होती. अशाप्रकारे, शिष्यवृत्ती अर्जांसोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या ऑनलाइन

---

[2] अनुदानित/अंशत: अनुदानित: तीन; विना-अनुदानित/विद्यापीठ व्यवस्थापित (विना-अनुदानित): तीन; शासकीय: दोन आणि विद्यापीठ विभाग: दोन

पडताळणीसाठी एकूण 90 संस्थांची[3] निवड करण्यात आली. प्रत्येक संस्थेतून 30 अर्ज (ज्यांची शिष्यवृत्ती ₹ 2,000 पेक्षा जास्त आहे) छाननीसाठी निवडले होते. त्यानुसार, ह्या 90 संस्थांमधून, अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या ऑनलाइन छाननीसाठी एकूण 2,241 अर्ज[4] निवडले होते.

निवडलेल्या जिल्ह्यांतील, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाचे सहाय्यक आयुक्त, यांचे अभिलेखे (तपशीलवार तपासणीसाठी), अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून स्थापित केले गेलेले थेट लाभ हस्तांतरण कक्ष, सामान्य प्रशासन विभागाच्या अधीन असलेले माहिती तंत्रज्ञान संचालनालय आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ लिमिटेड[5] यांची चाचणी-तपासणी करण्यात आली.

2018-19 ते 2020-21 या वर्षांसाठी निवडलेल्या दोन्ही योजनांचा शिष्यवृत्ती विदा महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ लिमिटेडने सादर केला होता. विद्यार्थ्यांचे पालक हे शासकीय कर्मचारी/शासकीय निवृत्तीवेतनधारक होते किंवा कसे हे तपासण्यासाठी राज्य शासकीय कर्मचारी सामान्य भविष्य निर्वाह निधी व निवृत्तीवेतनधारक याबाबतचा विदा, महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई व नागपूर या कार्यालयांकडून प्राप्त केलेला विदासुद्धा लेखापरीक्षणाद्वारे उपयोगात आणला होता.

संगणकीकृत लेखापरीक्षण टूल्स (आयडिया आणि पोस्टग्रे स्ट्रक्चर्ड क्वेरी लँग्वेज) यांच्या मदतीने विदा समूहाचे (डेटासेट) विश्लेषण केले गेले. जेथे अर्जदाराच्या विदाची फेर-तपासणी किंवा छाननी आवश्यक होती, तेथे ती छाननी, महाडीबीटीच्या पोर्टलवर[6] लॉग-इन करून केली गेली, जेथे वापरकर्त्याला अर्जदाराच्या शिष्यवृत्तीची सद्यस्थिती, जसे की, अर्ज स्वीकारले गेले अथवा नाकारले गेले, निधी संवितरीत केला गेला किंवा अर्जातील काही त्रुटींमुळे प्रलंबित राहिला, अर्जदारांचे वैयक्तिक तपशील, अर्जदाराची अपलोड केलेली कागदपत्रे, अर्जदाराला तसेच संस्थांना संवितरीत केलेली शिष्यवृत्तीची रक्कम हे पाहण्याची सुविधा उपलब्ध होती. योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे ऑनलाइन

[3] अनुदानित/अंशत: अनुदानित: 33; विना-अनुदानित/विद्यापीठ व्यवस्थापित (विना-अनुदानित): 30; शासकीय: 18; विद्यापीठ विभाग: नऊ. ज्या जिल्ह्यांमध्ये निवडक श्रेणीतील संस्था नव्हत्या, त्यांची निवड उरलेल्या श्रेणींमधून केली गेली

[4] निवडलेल्या संस्थांमध्ये प्रत्येक श्रेणीमध्ये आवश्यक अर्जांची संख्या उपलब्ध नसल्यामुळे 2,700 (30 अर्ज x निवडक 90 संस्था=2,700) अर्जांमधून 2,241 अर्ज निवडले गेले

[5] महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ लिमिटेड (महाआयटी) ही माहिती, दळणवळण आणि तंत्रज्ञान उपक्रमांच्या कार्यक्षम आणि प्रभावी अंमलबजावणीला चालना देण्यासाठी आणि एक मजबूत ई-गव्हर्नन्स इको-सिस्टिम चौकट स्थापित करण्यासाठी, कंपनी अधिनियम, 2013 अंतर्गत नोंदणीकृत शासकीय कंपनी आहे

[6] महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने विकसित केलेले डीबीटी पोर्टल महाडीबीटी पोर्टल म्हणून ओळखले जाते

असल्याने, शिष्यवृत्ती अर्जांची छाननी करण्यासाठी या सुविधेचा वापर करून, दूरवर्ती लेखापरीक्षण (रिमोट ॲक्सेस ऑडिट) करण्यात आले.

प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग आणि प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्याबरोबर 12 फेब्रुवारी, 2021 रोजी लेखापरीक्षण पूर्व बैठक आयोजित करण्यात आली. फेब्रुवारी 2021 ते मार्च 2022 दरम्यान लेखापरीक्षण करण्यात आले आणि 2018-19 ते 2020-21 या शैक्षणिक वर्षांचा समावेश करण्यात आला. 7 डिसेंबर 2022 रोजी आयोजित केलेल्या निर्गमन बैठकीत लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांवर अतिरिक्त मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याबरोबर चर्चा केली गेली आणि विभागाकडून प्राप्त झालेले प्रतिसाद योग्य रीतीने अहवालात समाविष्ट केले आहेत. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्राप्त (डिसेंबर, 2022) झालेली उत्तरे अहवालात यथायोग्य समाविष्ट केली आहेत.

## 1.8 अभिस्विकृती

कोविड-19 महामारीमुळे उद्भवलेल्या अडचणी असून देखील लेखापरीक्षण सुरळीत पार पाडण्याकरिता अभिलेखे, माहिती आणि स्पष्टीकरणे वेळोवेळी प्रदान केल्याने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ लिमिटेड, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, राज्य थेट लाभ हस्तांतरण कक्ष यांनी केलेल्या सहकार्य आणि सहाय्याबद्दल लेखापरीक्षा आभारी आहे.

# प्रकरण 2

# थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी

**प्रकरण 2**

# थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी

***हे प्रकरण थेट लाभ हस्तांतरण प्रणालीचा विकास आणि त्याची अंमलबजावणी, थेट लाभ हस्तांतरण उपयोजनेची माहिती तंत्रज्ञान सुरक्षा, बिझनेस प्रोसेस रि-इंजिनीअरींग, शिष्यवृत्ती संवितरण, इतर राज्य शासन प्रणालींबरोबर ॲप्लिकेशन इंटिग्रेशन आणि संनियंत्रण यंत्रणा यावर प्रकाश टाकते.***

***प्रणालीच्या सुरक्षा लेखापरीक्षेत सातत्य नसल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले. व्यवसाय नियमभंगाची अनेक प्रकरणे जसे की, महत्त्वाच्या कागदपत्रांशिवाय शिष्यवृत्ती अर्ज मंजूर केले जाणे, अयोग्य देयक निर्माण, अतिरिक्त शिष्यवृत्ती संवितरणे निदर्शनास आली.***

***शिष्यवृत्ती वितरणामध्ये विलंब होता आणि राज्य शासनाच्या इतर प्रणालीबरोबर थेट लाभ हस्तांतरण प्रणाली एकात्मिक न केल्याच्या परिणामी अपात्र अर्जदारांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला. पर्याप्त संनियंत्रण यंत्रणा देखील उभारण्यात आलेली नव्हती.***

## 2.1 महाराष्ट्रामधील थेट लाभ हस्तांतरण प्रणाली

**परिच्छेद 1.3** मध्ये नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र इन्फर्मेशन टेक्नोलॉजी कॉर्पोरेशन लिमिटेड, यांनी महाराष्ट्र राज्य थेट लाभ हस्तांतरण आणि सेवा पोर्टल[1] (महाडीबीटी) विकसित केले जे ऑगस्ट 2018 पासून कार्यरत होते. महाराष्ट्र राज्य थेट लाभ हस्तांतरण पोर्टल हे लाभार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे लाभ आणि अर्थसहाय्य संवितरण करण्याचा प्राथमिक उद्देश असलेले एकात्मित राज्यव्यापी पोर्टल आहे. महाराष्ट्र राज्य थेट लाभ हस्तांतरण पोर्टल हे राज्य कोषागार, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस), जात वैधता समित्या आणि भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (युआयडीएआय) यासारखी विविध अभिकरणे/प्राधिकरणे यांच्याबरोबर बहुविध एकात्मिकता परिकल्पित करते.

शिष्यवृत्तीसाठीची थेट लाभ हस्तांतरण संवितरण प्रक्रिया खालीलप्रमाणे होती:

- महाडीबीटी पोर्टल अंतर्गत कोणतेही कल्याणकारी लाभ घेऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही नागरिकाने/अर्जदाराने पोर्टलवर नोंदणी करणे आणि वैयक्तिक माहिती (प्रोफाईल) तयार करणे अनिवार्य होते. पोर्टलवर नोंदणी केल्यावर आणि वैयक्तिक माहिती

---

[1] महाडीबीटी प्रणालीसाठी एमएस एसक्युएल सर्व्हर 2012; विंडोज ऑपरेटींग सिस्टीम; इंटरनेट इन्फर्मेशन सर्व्हिसेस ॲप्लीकेशन सर्व्हर; व्हिज्युअल स्टुडियो 2015 फ्रेमवर्क; सी# जेक्वेरी अँड जावास्क्रीप्ट ॲप्लीकेशन प्रोग्रॅमिंग लँग्वेज असलेले डेटाबेस, ॲमेझॉन वेब सर्व्हिसेसच्या क्लाऊड प्लॅटफॉर्मवर होस्ट केले आहे

तयार केल्यावर अर्जदार पात्रता निकष व पोर्टलवरील अधिसूचित योजनांसाठी पात्रता तपासू शकतो.

- सादर केलेला अर्ज संस्था/प्राधिकरण आणि विभाग स्तरावर बहुस्तरीय छाननी प्रक्रियेतून जातो. अर्जदाराकडून पर्याप्त माहिती/कागदपत्रे प्राप्त न झाल्यास महाडीबीटी पोर्टलवर विविध छाननी स्तरावर "परत पाठवा" हा पर्याय सुद्धा उपलब्ध आहे. प्रत्येक स्तरावरुन आवश्यक त्या सर्व परवानग्या पूर्ण झाल्यानंतर देयक निर्माण करण्यासाठी अर्ज पाठविला जातो.
- महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचे ऑनलाइन देयक (बिल) पोर्टल असलेले अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, वाटप आणि संनियंत्रण प्रणाली (बीम्स), ह्याबरोबर महाडीबीटी पोर्टल एकात्मिक केलेले आहे.
- महाराष्ट्र कोषागार नियमामध्ये विहित आणि लागू प्रपत्रामध्ये विभागीय आहरण व संवितरण अधिकारी कोषागार देयके तयार करतात. त्यानंतर, महाराष्ट्र कोषागार नियमांनुसार देयके व तयार केलेली कागदपत्रे मंजुरीसाठी आणि नोंदणीकृत बँक खात्यात प्रदाने करण्यासाठी कोषागार कार्यालयाकडे सादर केली जातात.
- संबंधित विभागाने बीम्समध्ये नोंदणी केलेल्या योजना-विशिष्ट बँक खात्यात कोषागार अधिकारी मंजूर रक्कम हस्तांतरित करतात.
- योजना-विशिष्ट खात्यात आहरण व संवितरण अधिकारी यांना रक्कम प्राप्त झाल्यानंतर, आहरण व संवितरण अधिकारी ही रक्कम "केंद्रीय संचय खाते" जे लाभार्थींना लाभ हस्तांतरित करण्यासाठीचे त्रयस्थ (एस्क्रो) खाते आहे, ह्यामध्ये हस्तांतरित करतात. एकदा केंद्रीय संचय खात्यामध्ये निधी जमा झाल्यावर, अर्जदाराला महाडीबीटी पोर्टलवरून अधिसूचना प्राप्त होते, जेणेकरून अर्जदार ई-व्हाउचर प्राप्त करू शकेल आणि अर्जाच्या स्वरूपानुसार आधार-संलग्न बँक खात्यात किंवा थेट संबंधित अधिकृत संस्थेच्या/अभिकरणाच्या खात्यात थेट लाभ संवितरण प्राप्त करू शकेल.
- एकदा का अर्जदाराने महाडीबीटी पोर्टलवरील प्राप्तीचे बटण दाबले, की संवितरण प्रक्रिया सुरू होते आणि सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे संबंधित लाभार्थी किंवा अधिकृत संस्थेच्या/अभिकरणाच्या खात्यात लाभ हस्तांतरित होतात.
- महाडीबीटी पोर्टलकडून सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीला प्रदान (पेमेंट) फाईलमध्ये माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रधान सचिवांची अंकीकृत (डिजिटल) स्वाक्षरी प्रमाणपत्र प्रमाणनाच्या स्वरुपात अधिकृत परवानगी असते आणि "केंद्रीय संचय खाते" सांभाळणाऱ्या बँकेकडे नस्ती (फाईल) पाठवली जाते, जेणेकरून बँक प्रमाणन पडताळून बघू शकेल आणि लाभार्थ्यांच्या खात्यात लाभ हस्तांतरित करू शकेल.
- ज्या मंजूर अर्जदार/संस्था यांच्या नावे कोषागार देयके तयार केली जातात त्यांना लाभार्थी नोंदणी प्रक्रियेद्वारा वैध करून सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीमध्ये नोंदणीकृत केले जाते. लाभार्थी नोंदणीसाठी अर्जदार/संस्था यांचे तपशील विहित नमुन्यामध्ये सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीला पाठविले

जातात, जे नंतर वैध केले जातात आणि नोंदणीकृत केले जातात. ताळमेळ आणि अयशस्वी/बाद प्रकरणांची हाताळणी महाडीबीटी पोर्टलद्वारे केली जाते. अर्जदारांना अपयशाची कारणे पाठविली जातात आणि सुधारणा केल्यानंतर, अर्जदाराचे तपशील पुन्हा वैधतेसाठी व नोंदणीसाठी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीला पाठविले जातात. अर्जदारांचे बँक तपशील (आधार-संलग्न खाती) वैध व सक्रिय आहेत आणि भविष्यातील देयके प्रदान केली जाऊ शकतात याची खात्री करण्यासाठी प्रामुख्याने वैधता आणि नोंदणी केली जाते.

थेट लाभ हस्तांतरण शिष्यवृत्ती योजनेचा कार्यप्रवाह **आलेख 2.1 आणि आलेख 2.2** मध्ये दर्शविला आहे.


**आलेख 2.1: थेट लाभ हस्तांतरण शिष्यवृत्ती योजना कार्यप्रवाह**




*स्त्रोत: महाआयटीने सादर केलेली माहिती*

*टीप: थेट लाभ हस्तांतरण प्रणाली बिगर-आधार अर्जदारांना सुद्धा स्विकारते, परंतु अर्जदाराने आधार क्रमांक प्राप्त केल्यानंतरच अशा अर्जदारांना त्यानंतर संवितरण केले जाते.*

**आलेख 2.2: थेट लाभ हस्तांतरण योजना- तपशीलवार प्रक्रिया प्रवाह**




*स्त्रोत: महाआयटीने सादर केलेली माहिती*

इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती आणि विमुक्त जाती भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची ठळक वैशिष्ट्ये **तक्ता 2.1** मध्ये दर्शविली आहेत.

**तक्ता 2.1: मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेची ठळक वैशिष्ट्ये**

| तपशील | ठळक वैशिष्ट्ये |
|---|---|
| **पात्रता निकष** | 1) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ₹ एक लाखापर्यंत आहे, त्यांना पूर्ण शिष्यवृत्ती मिळू शकते. महाराष्ट्र शासनाने मार्च 2021 मध्ये उत्पन्नाची मर्यादा ₹ 1.50 लाख प्रतिवर्ष इतकी वाढविली.<br>2) अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असायलाच हवा.<br>3) अर्जदार शासनमान्य शैक्षणिक अभ्यासक्रम करणारा हवा.<br>4) पुढच्या वर्षामध्ये (शैक्षणिक वर्ष) बढती न मिळेपर्यंत रिपीटर्स शिष्यवृत्तीसाठी पात्र नसतील.<br>5) एकाच पालकाचे जास्तीत जास्त दोन मुलगे शिष्यवृत्तीसाठी पात्र असतील तर शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मुलींच्या संख्येवर कोणतेही बंधन नव्हते.<br>6) अर्जदारांनी दुसरी शिष्यवृत्ती/विद्यावेतन स्विकारल्यास ती स्विकारल्याच्या दिनांकापासून अर्जदाराला ह्या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती देय नव्हती. |
| **दिले जाणारे लाभ** | 1) शिष्यवृत्तीमध्ये इतर गोष्टींबरोबरच निर्वाह भत्ता, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, ग्रंथालय शुल्क, प्रवेश शुल्क यांचा समावेश असतो. विना-अनुदानित संस्थांमध्ये शिकणारे इतर मागासवर्गीय विद्यार्थी हे शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कासाठी 50 *टक्के* आणि इतर शुल्कासाठी 100 *टक्के* पात्र होते. अनुदानित संस्थांमध्ये शिकणारे इतर मागासवर्गीय विद्यार्थी व अनुदानित व विना-अनुदानित संस्थांमध्ये शिकणारे विमुक्त जाती भटक्या जमातीचे विद्यार्थी 100 *टक्के* शिष्यवृत्तीसाठी पात्र होते.<br>2) शिष्यवृत्ती संवितरण दोन हप्त्यांत केले जाते.<br>3) विद्यार्थ्यांशी संबंधित शिष्यवृत्ती घटक (परीक्षा शुल्क व निर्वाह भत्ता) हे विद्यार्थ्यांच्या खात्यात आणि जे महाविद्यालयाशी संबंधित आहेत (शिक्षण व इतर शुल्क), महाविद्यालयाच्या खात्यात जमा केले जातात. |
| *स्त्रोत: महाडीबीटी पोर्टल व भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांमधून (2018) प्राप्त केलेली माहिती* | |

2018-19 ते 2020-21 या कालावधीसाठी पोर्टलवर प्राप्त अर्ज व संवितरीत शिष्यवृत्ती **तक्ता 2.2** मध्ये दर्शविली आहे व तपशील **परिशिष्ट 2.1** मध्ये दिले आहेत.

**तक्ता 2.2: वर्ष-निहाय प्राप्त अर्जांची संख्या व संवितरीत रक्कम**

| शिष्यवृत्ती श्रेणी | शैक्षणिक वर्ष | प्राप्त अर्जांची संख्या | एकूण संवितरीत रक्कम (₹ कोटीत) |
|---|---|---|---|
| इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 2018-19 | 6,78,770 | 747.94 |
| | 2019-20 | 5,88,696 | 716.13 |
| | 2020-21 | 6,25,861 | 809.10 |
| विमुक्त जाती भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 2018-19 | 2,88,044 | 507.07 |
| | 2019-20 | 2,52,544 | 522.47 |
| | 2020-21 | 2,59,460 | 640.31 |
| **एकूण** | | **26,93,375** | **3943.02** |
| *स्त्रोत: महाडीबीटी पोर्टलवरून लेखापरीक्षेने संकलित केलेली माहिती* | | | |

## 2.2. प्रणालीचे दस्तऐवज तयार न करणे

माहिती तंत्रज्ञान प्रणालीचे तांत्रिक दस्तऐवजीकरण, जसे की सिस्टिम रिक्वायरमेंट स्पेसिफिकेशन, सिस्टिम डिझाईन डॉक्युमेंटेशन, एन्टीटी रिलेशन डायग्राम, प्रणालीचा दर्जा सुनिश्चित करण्यासाठी तसेच भविष्यातील देखभालीसाठी आवश्यक आहे.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, प्रणाली दस्तऐवज तयार करण्याची तरतूद केली नव्हती. प्रणाली दस्तऐवजीकरणाच्या अभावाच्या परिणामी विभागाच्या कामकाजाविषयीच्या गरजा प्रणालीमध्ये समावेश न होण्यात होऊ शकतो. तसेच, प्रणाली दस्तऐवजाअभावी भविष्यात प्रकल्प दुसऱ्या सिस्टिम इंटिग्रेटरकडे हस्तांतरित झाल्यास सिस्टिम इंटिग्रेटर प्रणाली चालविण्यास असमर्थ ठरू शकतो. त्यांच्या कार्यचालनामध्ये व्यत्यय येऊ शकतो व प्रणालीच्या कार्यचालनाची खातरजमा करताना वेळेचा व स्त्रोतांचा अपव्यय होऊ शकतो.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वस्तुस्थिती मान्य करताना नमूद (डिसेंबर 2022) केले की, त्यांनी प्रणाली दस्तऐवज तयार करण्यास सुरुवात केली आहे आणि जून 2023 पर्यंत ते पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

***शिफारस 1: शासनाने हे सुनिश्चित करावे की प्रणाली दस्तऐवज प्राप्त केले जातील व अभिलेख्यावर ठेवले जातील, ज्यामुळे भविष्यातील प्रणालीच्या देखभालीस मदत होईल.***

## 2.3 माहिती तंत्रज्ञान सुरक्षा

माहिती तंत्रज्ञान सुरक्षा ही एखाद्या संस्थेला विविध सुरक्षा धोक्यांपासून तिच्या माहिती प्रणालीच्या पायाभूत सुविधांचे संरक्षण करण्यास अनुमती देते. सुरक्षा प्रमाणिकीकरणाशी संबंधित लेखापरीक्षण निष्कर्षांची चर्चा पुढील परिच्छेदांमध्ये केली आहे.

### 2.3.1 वेब-आधारित ॲप्लीकेशन्ससाठी भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांचे अनुपालन न करणे

राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राने जारी (जानेवारी 2014) केलेल्या भारत सरकारच्या संकेतस्थळांसाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, पोर्टल सुरू होण्यापूर्वी (गो-लाईव्ह) वेब ॲप्लीकेशन्सचे अनुपालन लेखापरीक्षण होणे आवश्यक होते. ॲप्लीकेशन्सचे सुरक्षा लेखापरीक्षण राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र/कम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टिम यांच्या पॅनलमधील अभिकरणांद्वारे करणेसुद्धा आवश्यक होते.

लेखापरीक्षण छाननीत असे उघड झाले की, महाडीबीटी पोर्टलसाठीचे सुरक्षा प्रमाणपत्र कम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टिमच्या पॅनलमधील सुरक्षा लेखापरीक्षकांनी जारी (ऑगस्ट 2019) केले होते. प्रमाणपत्र जारी केल्यापासून एक वर्षापर्यंत किंवा पोर्टलमध्ये कुठलेही महत्त्वाचे अतिरिक्त बदल यापैकी जे आधी असेल तोपर्यंत प्रमाणन वैध होते. तथापि, ऑगस्ट 2020 मध्ये एक वर्षाचा कालावधी संपूनसुद्धा मार्च 2022 पर्यंत त्यानंतरचे प्रमाणन केले गेले नव्हते.

वेब आधारित ॲप्लीकेशन्स हॅक किंवा तडजोड होण्यापासून सुरक्षित आणि भेद्यतेपासून मुक्त आहेत, हे सुनिश्चित करण्यातसुद्धा सुरक्षा लेखापरीक्षा महत्त्वपूर्ण भूमिका बजावित असल्यामुळे ठराविक कालावधीनंतर सुरक्षा लेखापरीक्षा करणे व्यवसाय सातत्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की, सुरक्षा लेखापरीक्षा पूर्ण झाली आहे. ठराविक कालावधीत सुरक्षा लेखापरीक्षा झाली नाही ही वस्तुस्थिती कायम राहते. भविष्यात ठराविक कालावधीनंतर सुरक्षा लेखापरीक्षा बंधनकारक करण्याचे सुनिश्चित करण्यासाठी कोणती यंत्रणा उभी करण्यात आली हेही उत्तरात नमूद करण्यात आलेले नाही.

***शिफारस 2: शासनाने विशिष्ट कालावधीनंतर ॲप्लीकेशन्सची सुरक्षा लेखापरीक्षा न चुकता केली जात आहे ह्याची सुनिश्चिती करावी.***

## 2.4 थेट लाभ हस्तांतरण प्रणालीची अंमलबजावणी

महाडीबीटी प्रणालीमध्ये लाभार्थ्यांची अचूक निश्चिती, निधी हस्तांतरणात पारदर्शकता, गळती रोखणे आणि लाभ वितरणातील कार्यक्षमता वाढविणे यासारख्या योजनेची उद्दिष्टे सुनिश्चित करण्यासाठी मानवी प्रणालीचे ऑनलाइन प्रणालीत रूपांतरण करणे परिकल्पित केले आहे.

थेट लाभ हस्तांतरण प्रणालीच्या अंमलबजावणीतील त्रुटी पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिल्या आहेत.

### 2.4.1 अनिवार्य दस्तऐवज अपलोड न करूनही शिष्यवृत्ती अर्जांचा स्वीकार

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी इतर मागासवर्गीय व विमुक्त जाती भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना अर्जदाराने सादर करावयाची प्रमाणपत्रे जसे की मिळकतीचा दाखला, जातीचा दाखला व अधिवास प्रमाणपत्र यासारखी विविध प्रमाणपत्रे विहित केली आहेत.

2018-19 ते 2020-21 या शैक्षणिक वर्षात प्रथमच सादर केलेल्या अर्जांसोबत मिळकतीचा दाखला व जातीचा दाखला ही दोन महत्त्वाची कागदपत्रे प्रणालीमध्ये अपलोड केली होती का याचे निर्धारण करण्यासाठी चाचणी-तपासणी केलेल्या नऊ जिल्ह्यांमधील विदाचे विश्लेषण केले गेले. विश्लेषणामध्ये असे उघड झाले की, **तक्ता 2.3**. आणि **तक्ता 2.4**. मध्ये दर्शविल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रांशिवाय प्रणालीने अर्ज स्विकारले होते.

**तक्ता 2.3: मिळकतीच्या दाखल्याशिवाय स्विकारलेले अर्ज**

| मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती यांच्यासाठी | मिळकतीच्या दाखल्याशिवाय मंजूर केलेल्या अर्जांची संख्या | | | एकूण | अर्जांची एकूण संख्या जेथे प्रदाने आरंभ केली/पूर्ण केली | एकूण प्रदान/देय (₹ कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | | | |
| इतर मागासवर्गीय | 1,042 | 382 | 155 | 1,579 | 1,041 | 2.97 |
| विमुक्त जाती भटक्या जमाती | 496 | 221 | 83 | 800 | 475 | 2.48 |
| एकूण | | | | **2,379** | **1,516** | **5.45** |
| *स्त्रोत: महाआयटीने सादर केलेल्या विदाचे विश्लेषण* | | | | | | |

**तक्ता 2.4: जातीच्या दाखल्याशिवाय स्विकारलेले अर्ज**

| मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती यांच्यासाठी | जातीच्या दाखल्याशिवाय मंजूर केलेल्या अर्जांची संख्या | | | एकूण | अर्जांची एकूण संख्या जेथे प्रदाने आरंभ केली/पूर्ण केली | एकूण प्रदान/देय (₹ कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | | | |
| इतर मागासवर्गीय | 395 | 266 | 102 | 763 | 344 | 0.49 |
| विमुक्त जाती भटक्या जमाती | 203 | 150 | 57 | 410 | 153 | 0.32 |
| एकूण | | | | **1,173** | **497** | **0.81** |
| *स्त्रोत: महाआयटीने सादर केलेल्या विदाचे विश्लेषण* | | | | | | |

**तक्ता 2.3** आणि **2.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 3,552 (2,379 + 1,173) अर्ज हे अर्जदारांनी महत्त्वाची कागदपत्रे अपलोड केली नव्हती तरीसुद्धा प्रणालीने प्रक्रिया केली होती.

महत्त्वाची कागदपत्रे अपलोड न करता देखील महाडीबीटी प्रणाली अर्ज सादर करण्यास परवानगी देते हे तथ्य हे दर्शविते की, अर्जदाराने योजना-अनिवार्य कागदपत्रे अपलोड केली आहेत ह्याची सुनिश्चिती करण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण प्रणालीत महत्त्वाची व्यवसाय वैधता तपासणी नव्हती. तसेच, महत्त्वाची कागदपत्रे अपलोड न करूनही विभागीय प्राधिकाऱ्यांनी अर्ज मंजूर केल्याचे तथ्य हे दर्शविते की, विभागीय प्राधिकाऱ्यांच्या विविध पडताळणी प्रक्रियेत त्रुटी होत्या.

लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की, अनिवार्य कागदपत्रांशिवाय सादर केलेले काही अर्ज महाविद्यालय/विभागीय प्राधिकाऱ्यांकडून अर्जदारांना परत पाठविले गेले होते. तथापि, प्रणालीमध्ये वैधता तपासणीच्या अभावाने विलंब झाला आणि त्यायोगे संपूर्ण प्रक्रियेच्या कार्यक्षमतेत घट झाली.

जिल्हा सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सोलापूर यांनी सांगितले (फेब्रुवारी 2022) की, लेखापरीक्षेने लक्षात आणून दिलेल्या सर्व प्रकरणांमध्ये सर्व कागदपत्रे सादर केलेले अर्ज मंजूर केले होते, जे अर्जदारांच्या महाविद्यालय/संस्थांनी अपलोड केले होते कारण अर्जदाराने कागदपत्रे सादर करावयाचा कालावधी संपला होता

आणि पुढे असे सांगितले की कागदपत्रे, महाडीबीटी प्रणालीमधील महाविद्यालय/संस्थांनी अपलोड केलेली कागदपत्रे विभागात दिसत होती.

महाडीबीटी प्रणालीच्या महाविद्यालये/संस्थानी अपलोड केलेली कागदपत्रे या विभागात कागदपत्रे दिसत आहेत हे उत्तर योग्य नाही, कारण, महाडीबीटी पोर्टलच्या फ्रंट-एंड सुविधेद्वारे लेखापरीक्षणात केलेल्या पडताळणीत आणि महाआयटीद्वारे प्राप्त झालेल्या विदामध्ये कागदपत्रे दिसली नाहीत. तसेच, महाडीबीटी प्रणालीचा ॲप्लिकेशन प्रोसेस वर्कफ्लो (उपयोजन प्रणाली कार्यप्रवाह) सुद्धा अर्जदारांची कागदपत्रे महाविद्यालय/संस्थांनी अपलोड करण्याची अशी सुविधा दर्शवित नव्हता.

निर्गमन बैठकीमध्ये, विभाग प्रमुख, महाआयटी यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की, प्रणालीमध्ये वैधता तपासणीचा अभाव होता आणि आता त्याचा समावेश करण्यात आला आहे.

### 2.4.2 अपलोड केलेले दस्तऐवज दिसत नसूनसुद्धा शिष्यवृत्ती अर्जांची मंजूरी

इतर मागासवर्गीय व विमुक्त जाती भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या ऑनलाइन अर्जांसाठी विद्यार्थ्यांना विविध दस्तऐवज अपलोड करावयाचे होते, जे योग्य प्राधिकाऱ्यांना शिष्यवृत्ती अर्जांचे मूल्यांकन करण्यास आणि मंजूरी देण्यात/फेटाळण्यात सहाय्यभूत होईल.

लेखापरीक्षणात निवडलेल्या 2,241 मंजूर अर्जांच्या तपासणीत असे निदर्शनास आले की 922 अर्जांमध्ये (मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती-इतर मागास वर्गीय: 647 अर्ज आणि मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती- विमुक्त जाती भटक्या जमाती: 275 अर्ज), अर्जांसोबत जोडलेली कागदपत्रे दिसत नव्हती.

हे दोन स्तरांवरील अपयशाचे द्योतक होते, एक थेट लाभ हस्तांतरण अर्ज प्रणाली स्तर जो अपलोड केलेली कागदपत्रे दाखविण्यास असमर्थ होता आणि म्हणून आऊटपुट कंट्रोल व्हॅलिडेशनचा भंग होत होता ज्यात विशिष्ट प्रक्रियेचे आऊटपुट पूर्ण आणि अचूक करणे आवश्यक असते, जेणेकरून अर्जांच्या पुढील प्रक्रियेवर परिणाम होत नाही. अपयशाचा दुसरा स्तर हा मानवी तपासणी व मंजूरी प्रक्रियेमधील होता, ज्यामध्ये अर्ज प्रक्रियेमध्ये उणीवा असूनही अशा प्रकारचे अर्ज मंजूर करण्यास परवानगी देत होता.

थेट लाभ हस्तांतरण प्रणालीचे यश हे पद्धतशीर तपासणी आणि ॲप्लिकेशन प्रणाली तसेच मानवी स्तर या दोन्हींचा समतोल यावर अवलंबून आहे. यापैकी कोणत्याही स्तरावरील अपयश, विशेषत्वाने माहिती तंत्रज्ञान प्रणालीच्या संदर्भात ज्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रभाविततेशी तडजोड होईल.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की, शिष्यवृत्ती अर्जांशी संबंधित कागदपत्रांची पडताळणी करण्याची जबाबदारी छाननी अधिकाऱ्यांची होती. पुढे असेही स्पष्टीकरण देण्यात आले की, एका विशिष्ट वर्षाची कागदपत्रे त्यानंतरच्या वर्षांत वगळल्यामुळे गहाळ झाली आणि ही समस्या दूर करण्यात आली आहे. लेखापरीक्षणात सर्व शैक्षणिक वर्षांची कागदपत्रे असलेली उदाहरणे/अर्ज

निदर्शनात आले. त्यामुळे, मागील वर्षांची कागदपत्रे पुढील वर्षी वगळल्यामुळे गहाळ झाले हे उत्तर ग्राह्य नाही, कारण अशा वगळण्यामुळे सर्व अर्जांवर समान परिणाम झाला असता.

### 2.4.3 भ्रमणध्वनी क्रमांक एकापेक्षा अधिक अर्जांसोबत जोडले गेले

वैधकरण आणि प्रमाणन हे त्या क्रमांकावर ओटीपी (एक वेळेचा पासवर्ड) पाठवून केले जात असल्याने वैध फोन क्रमांक ही पूर्व अट होती. तसेच, संवितरणाविषयीची अधिसूचना सुद्धा महाडीबीटी पोर्टलद्वारा नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर दिली जात होती. त्यामुळे, वापरकर्त्याद्वारा प्रविष्ट (फिड) केलेला भ्रमणध्वनी क्रमांक हा बरोबर आणि अर्जदाराचा असायला हवा.

लेखापरीक्षण विश्लेषणात एकच भ्रमणध्वनी क्रमांक अनेक अर्जांसोबत जोडला गेल्याची उदाहरणे निदर्शनास आली. भ्रमणध्वनी क्रमांक 20 किंवा त्यापेक्षा जास्त अर्जांना जोडल्याचा योजना-निहाय तपशील **तक्ता 2.5** व उदाहरणात्मक प्रकरणे **परिशिष्ट 2.2** मध्ये दर्शविली आहेत.

**तक्ता 2.5: 20 किंवा जास्त अर्जांना जोडले गेलेले भ्रमणध्वनी क्रमांक**

| योजनेचे नाव | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | एकूण |
|---|---|---|---|---|
| इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 189 | 195 | 127 | 511 |
| विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 76 | 69 | 41 | 186 |
| **एकूण** | **265** | **264** | **168** | **697** |
| *स्त्रोत: महाआयटीने सादर केलेल्या विदाचे विश्लेषण* | | | | |

**तक्ता 2.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 697 भ्रमणध्वनी क्रमांक राज्यातील 20 किंवा त्यापेक्षा जास्त अर्जांसोबत जोडले गेले होते.

अशा जोडल्या गेलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकांची व्याप्ती किती आहे ह्याचा अंदाज **तक्ता 2.6** वरून लावता येऊ शकतो.

**तक्ता 2.6: अर्जांना जोडले गेलेले पहिले पाच भ्रमणध्वनी क्रमांक**

| इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | | विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | |
|---|---|---|---|
| **भ्रमणध्वनी क्रमांक** | **अर्जांची संख्या** | **भ्रमणध्वनी क्रमांक** | **अर्जांची संख्या** |
| 82750XXX18 | 5019 | 82750XXX18 | 740 |
| 93736XXX90 | 1639 | 94237XXX51 | 634 |
| 97673XXX 91 | 1515 | 96891XXX08 | 358 |
| 91723XXX 04 | 1378 | 90674XXX52 | 345 |
| 90674XXX 52 | 780 | 91723XXX04 | 342 |
| *स्त्रोत: महाआयटीने सादर केलेल्या माहितीचे विश्लेषण* | | | |

एकाहून अधिक अर्जांना जोडले गेलेले भ्रमणध्वनी क्रमांक ही वस्तुस्थिती दर्शवितात की महाडीबीटी प्रणालीमध्ये केवळ एकच विशिष्ट भ्रमणध्वनी क्रमांक स्विकृत करण्याचे सुनिश्चित करण्यासाठी वैधकरण तपासणीचा अभाव होता. तसेच, विशिष्ट भ्रमणध्वनी क्रमांकाशिवाय अर्जदार शिष्यवृत्ती वितरणाच्या स्थितीविषयी किंवा अर्जामध्ये आवश्यक असलेल्या कोणत्याही बदलांविषयी अनभिज्ञ राहिला असता आणि अशाप्रकारे, मध्यस्थावर अवलंबून राहिल्याने थेट लाभ हस्तांतरण प्रणालीचे मध्यस्थांना वगळण्याचे उद्दिष्ट धोक्यात आले असते.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वस्तुस्थिती मान्य करताना सांगितले (डिसेंबर 2022) की, प्रत्येक अर्जदाराकडे संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी एक विशिष्ट भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे, यासाठी परिपत्रक जारी केले जाईल. तथापि, महाडीबीटी प्रणालीमध्ये फक्त विशिष्ट भ्रमणध्वनी क्रमांक स्वीकृत केला जाईल याची खात्री करण्यासाठी वैधता तपासणीचा समावेश करण्याबाबत उत्तरात मौन बाळगले होते.

### 2.4.4 वैधता तपासण्यांचा अभाव

संस्था/महाविद्यालये यांनी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करताना त्यांची अभ्यासक्रम-निहाय प्रवेश क्षमता प्रविष्ट करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, संस्था/महाविद्यालये ह्यांनी प्रविष्ट केलेल्या प्रवेश क्षमतेच्या विदांचा अचूकपणा सुनिश्चित करण्यासाठी प्रणालीमध्ये कोणत्याही वैधता तपासण्या नव्हत्या.

वैधता तपासणी अभावाच्या परिणामी प्रणाली संस्था/महाविद्यालयांच्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त अर्ज मंजूर झाल्याचे दर्शविते. शैक्षणिक वर्ष 2018-19 ते 2020-21 दरम्यानची अशी उदाहरणात्मक प्रकरणांची यादी **तक्ता 2.7** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 2.7: महाविद्यालये/संस्थांनी प्रवेश क्षमतेविषयी प्रणालीमध्ये प्रविष्ट केलेली चुकीची माहिती**

| अ.क्र. | महाविद्यालयाचा ओळख क्रमांक | अभ्यासक्रमाचा ओळख क्रमांक | शैक्षणिक वर्ष | अर्जदारांची एकूण संख्या | प्रणालीमध्ये प्रविष्ट केलेली महाविद्यालयाची प्रवेश क्षमता | प्रत्यक्ष प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 52712 | 2495 | 2018-19 | 11 | 1 | 20 |
| 2 | 52629 | 3583 | 2018-19 | 34 | 20 | 60 |
| 3 | 3248 | 1062 | 2018-19 | 74 | 60 | 120 |
| 4 | 52712 | 2495 | 2019-20 | 11 | 1 | 20 |
| 5 | 52712 | 2502 | 2019-20 | 4 | 1 | 20 |
| 6 | 52712 | 2512 | 2019-20 | 4 | 1 | 20 |
| 7 | 4891 | 1254 | 2019-20 | 41 | 30 | 72 |
| 8 | 52712 | 2495 | 2020-21 | 13 | 1 | 20 |
| 9 | 52712 | 2502 | 2020-21 | 6 | 1 | 20 |
| 10 | 2244 | 1254 | 2020-21 | 33 | 20 | 60 |

*स्त्रोत : महाआयटीने सादर केलेल्या माहितीचे विश्लेषण*

लेखापरीक्षणाद्वारे केलेल्या पडताळणीवरुन असे निदर्शनास आले की, महाडीबीटी प्रणालीमध्ये महाविद्यालये/संस्थांद्वारे प्रवेश क्षमता चुकीची प्रविष्ट केली गेली होती, जी विभागांनी देखील तपासली नव्हती; प्रणालीमध्ये प्रविष्ट केलेल्या माहितीच्या अचूकतेची खात्री करण्यासाठी ना वैधता तपासणी होती ना अशा त्रुटींची दुरूस्ती करण्याकरिता संकेत(फ्लॅग) देण्यासाठी व्यवस्थापन माहिती प्रणाली किंवा अपवाद अहवाल तयार केले जात होते, ज्यामुळे प्रणालीमध्ये प्रविष्ट केलेल्या माहितीच्या सत्यतेची सुनिश्चिती होईल.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वस्तुस्थिती मान्य करताना असे सांगितले (डिसेंबर 2022) की मूळ विभागाने निश्चित केल्याप्रमाणे प्रवेश क्षमतेनुसार (प्रवर्ग-निहाय) अर्जांची संख्या गोठविण्याचे निर्देश महाआयटी आणि महाडीबीटी यांना देण्यात येतील.

### 2.4.5 देयक निर्मिती दरम्यान लाभार्थ्यांचे सदोष प्राधान्यक्रम

देयके निर्मिती करणे ही आहरण व संवितरण अधिकाऱ्यांद्वारे सुरू होणारी एक स्वयंचलित प्रक्रिया आहे, ज्यामध्ये निधी उपलब्धतेवर अवलंबून, "फर्स्ट इन फर्स्ट आउट" पद्धतीचा वापर करून थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे देयक निर्मितीसाठी समाविष्ट करावयाच्या लाभार्थ्यांची संख्या निश्चित केली जाते.

"फर्स्ट इन फर्स्ट आउट" पद्धतीमध्ये, देयकांमध्ये समाविष्ट केलेल्या अर्जांना इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासनाद्वारे मंजुरीच्या तारखेनुसार प्राधान्य दिले जाते, म्हणजेच, नंतरच्या मंजुरीच्या तुलनेत आधीच्या मंजुरी अग्रक्रमी असतील.

देयकांच्या विदाच्या विश्लेषणाने "फर्स्ट इन फर्स्ट आउट" पद्धतीच्या उल्लंघनाची उदाहरणे दर्शविली ज्यामध्ये देयक तयार करताना नंतर मंजूर केलेल्या अर्जांना प्राधान्य दिले गेले. प्रकरणांचा नमुना **तक्ता 2.8** मध्ये दर्शविला आहे आणि उदाहरणात्मक प्रकरणे **परिशिष्ट 2.3** मध्ये दिली आहेत.

**तक्ता 2.8: देयक निर्माण करताना सदोष प्राधान्यक्रमाची उदाहरणात्मक प्रकरणे**

| मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | मंजुरीचे वित्तीय वर्ष | अर्ज क्र | तुकडीचा (बॅच) ओळख क्रमांक | अर्ज मंजुरीची तारीख | देयक निर्मितीची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| इतर मागासवर्गीय | 2019-20 | 1819VJO100090XX67 | 135859601 | 21-05-2019 | 19-07-2019 |
| इतर मागासवर्गीय | 2019-20 | 1819VJO100092XX79 | 135859601 | 21-05-2019 | 19-07-2019 |
| इतर मागासवर्गीय | 2019-20 | 1819VJO100021XX83 | 266187344 | 21-05-2019 | 21-09-2019 |
| इतर मागासवर्गीय | 2019-20 | 1819VJO100022XX42 | 266187344 | 21-05-2019 | 21-09-2019 |
| इतर मागासवर्गीय | 2019-20 | 1819VJO100020XX94 | 135859601 | 22-05-2019 | 19-07-2019 |
| इतर मागासवर्गीय | 2019-20 | 1819VJO100020XX15 | 135859601 | 22-05-2019 | 19-07-2019 |

*स्त्रोत: महाआयटीने सादर केलेल्या विदाचे विश्लेषण*

**तक्ता 2.8 मधील** विदा हे दर्शविते की "फर्स्ट इन फर्स्ट आउट" पद्धतीनुसार देयके निर्माण करताना लाभार्थ्यांचा समावेश करण्याच्या व्यावसायिक नियमाचे उल्लंघन झाले.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वस्तुस्थिती मान्य करताना असे सांगितले (डिसेंबर 2022) की, देयके निर्माण करताना सहाय्य घेतल्या जाणाऱ्या अर्जांच्या ओघाचा आढावा जून 2023 पर्यंत पूर्ण केला जाईल.

***शिफारस 3: शासनाने हे सुनिश्चित करावे की प्रणाली आवश्यकतेनुसार कार्य करीत आहे याची खात्री करण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यवसाय नियम योग्यरित्या नकाशित केले आहेत व काटेकोरपणे तपासले आहेत.***

### 2.4.6 थेट लाभ हस्तांतरणाच्या ऑनलाइन प्रक्रियेत मानवी प्रक्रियेचे अस्तित्व

आहरण व संवितरण अधिकारी हे देयक तयार केल्यानंतर, महाडीबीटी प्रणालीद्वारे देयकात समाविष्ट केलेल्या अर्जांच्या यादीसह देयकाची मुद्रित प्रत घेतात. त्यानंतर देयक इतर अनिवार्य प्रपत्रांसह स्वहस्ते मंजुरीसाठी कोषागारात सादर केले जाते.

कोषागाराने देयक मंजूर केल्यावर, देयकाची रक्कम कोषागाराद्वारे योजना-विशिष्ट खात्यात हस्तांतरित केली जाते, ज्यामधून शिष्यवृत्तीची रक्कम आहरण व संवितरण अधिकाऱ्याद्वारे केंद्रीय संचय खात्यात हस्तांतरित केली जाते.

हे लक्षात घेता, अर्ज प्रक्रियेच्या संपूर्ण ऑनलाइन साखळीमध्ये, मानवी प्रक्रिया अस्तित्वात होती, जी सहजपणे स्वयंचलित केली जाऊ शकली असती, ही एक मोठी कमतरता होती आणि ती दूर करणे आवश्यक आहे.

निर्गमन बैठकीत अतिरिक्त मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की ही बाब वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे मांडली जाईल.

***शिफारस 4: शासनाने थेट लाभ हस्तांतरण प्रणालीमधील रि-इंजिनीअरिंग आणि महाडीबीटी प्रणालीशी एकात्मकीकरणासाठी विद्‌यमान मानवी प्रक्रियांचा आढावा घ्यावा.***

### 2.4.7 संवितरणासाठी प्रलंबित अर्ज

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, 2018-19 ते 2020-21 या कालावधीत चाचणी-तपासणी केलेल्या दोन योजनांतर्गत चाचणी-तपासणी केलेल्या नऊ जिल्ह्यांमध्ये मंजूर झालेल्या 7.08 लाख अर्जांपैकी (इतर मागासवर्गीयांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती:4.79 लाख; विमुक्त जाती भटक्या जमातींसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती: 2.29 लाख), सप्टेंबर 2021[2] पर्यंत 41,151 अर्ज संवितरणासाठी प्रलंबित होते. लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की सर्व 41,151 अर्ज चार महिन्यांहून अधिक काळ संवितरणासाठी (पहिला हप्ता) प्रलंबित होते जे **तक्ता 2.9** मध्ये दर्शविले आहे.

[2] ज्या तारखेपर्यंत लेखापरीक्षणास माहिती सादर केली

**तक्ता 2.9: चाचणी-तपासणी केलेल्या जिल्ह्यांमधील संवितरणासाठी प्रलंबित अर्ज**

**(₹ लाखात)**

| अर्जाच्या मंजुरीचे वर्ष | प्रलंबितता कालावधी | | | | | | एकूण अर्जांची संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | चारहून अधिक परंतु सहा महिन्यांपेक्षा कमी | | सहा महिन्यांपेक्षा अधिक परंतु एका वर्षापेक्षा कमी | | एका वर्षापेक्षा अधिक | | | |
| | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | | |
| **इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर योजना** | | | | | | | | |
| **2019-20** | - | - | - | - | 80 | 2.62 | 80 | 2.62 |
| **2020-21** | 15,031 | 1,493.89 | 13,904 | 1,627.25 | 2 | 0.05 | 28,937 | 3,121.19 |
| **विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर योजना** | | | | | | | | |
| **2018-19** | | | | | 31 | 9.10 | 31 | 9.10 |
| **2019-20** | | | | | 18 | 0.99 | 18 | 0.99 |
| **2020-21** | 6,534 | 1,357.43 | 5,548 | 1,158.16 | 3 | 0.04 | 12,085 | 2,515.63 |
| **एकूण** | **21,565** | **2,851.32** | **19,452** | **2,785.41** | **134** | **12.80** | **41,151** | **5,649.53** |
| *स्त्रोत: महाआयटीने सादर केलेल्या माहितीचे विश्लेषण* | | | | | | | | |

सप्टेंबर 2021 च्या अखेरीस प्रलंबित 41,151 मंजूर अर्जांपैकी एकूण 5,831 अर्ज सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीशी निगडीत समस्यांमुळे प्रलंबित होते. उर्वरित 35,320 अर्ज थेट लाभ हस्तांतरण प्रणालीमध्ये प्रलंबित होते. थेट लाभ हस्तांतरण प्रणालीमध्ये प्रलंबित असलेल्या अर्जांची तपशीलवार कारणे ना लेखापरीक्षणासाठी सादर केलेल्या माहितीमध्ये उपलब्ध होती ना महाआयटीने त्यासाठीची कारणे सादर केली.

थेट लाभ हस्तांतरण प्रणालीचे उद्दीष्ट लाभार्थ्यांना निधीचे जलद संवितरण सुनिश्चित करणे हे असल्याने, आधारशी निगडीत समस्यांमुळे शिष्यवृत्तीचे संवितरण न झाल्याने, अर्ज प्रक्रिया आणि मंजूर करण्यास लागलेला संपूर्ण वेळ आणि मेहनत वाया जाते, म्हणूनच, प्रणालीद्वारे नाकारले जाण्यापासून रोखण्यासाठी, बँक खात्यांचे सत्यापन केल्यानंतरच अर्ज मंजूर केला जाईल हे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक तपासणी महाडीबीटी प्रणालीमध्ये अंतर्भूत करणे आवश्यक आहे. तात्काळ उपाययोजना म्हणून मंजूर अर्ज प्रलंबित राहण्याची कारणे शोधण्याचीही गरज होती.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की, मे 2020 पासून शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना बँक खात्याशी आधार जोडणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

### 2.4.8 शिष्यवृत्तीचे वितरण

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी ऑक्टोबर 2018 मध्ये जारी केलेल्या शासन निर्णयात थेट लाभ हस्तांतरण अर्जांवरच्या प्रक्रियेकरीता कार्यपद्धती आणि थेट लाभ हस्तांतरण अर्जाच्या प्रक्रियेत गुंतलेल्या विविध संस्था/प्राधिकारी यांची भूमिका स्पष्ट केली आहे. थेट लाभ हस्तांतरणाच्या परिकल्पित लाभांपैकी एक म्हणजे

योजनेचे लाभ हस्तांतरित करण्यासाठी लागणारा कालावधी कमी करणे, कारण थेट लाभ हस्तांतरणामध्ये निधीचे विना-विलंब संवितरण करण्याची क्षमता आहे.


या उद्दिष्टांच्या पूर्ततेची खात्री करण्यासाठी, चाचणी-तपासणी केलेल्या नऊ जिल्ह्यांमध्ये 2018-19 ते 2020-21 या कालावधीत विद्यार्थ्यांना/महाविद्यालयांना शिष्यवृत्तीचा पहिला हप्ता जारी करण्यासाठी लागणाऱ्या वेळेचे लेखापरीक्षणाने विश्लेषण केले.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, 2018-19, 2019-20 आणि 2020-21 दरम्यान इतर मागासवर्गीय मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या संवितरणासाठी लागणारा सरासरी कालावधी हा अनुक्रमे 88 दिवस, 126 दिवस, आणि 113 दिवस असा होता. 2018-19, 2019-20 आणि 2020-21 दरम्यान विमुक्त जाती भटक्या जमाती मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या संवितरणासाठी लागणारा सरासरी कालावधी हा अनुक्रमे 94 दिवस, 171 दिवस आणि 114 दिवस असा होता.

लेखापरीक्षणाने तीन टप्प्यात म्हणजे, (i) अर्ज मंजूर झाल्यापासून देयक निर्मितीपर्यंत, (ii) योजना-विशिष्ट खात्यात निधी हस्तांतरित झाल्यापासून ते केंद्रीय संचय खात्यात हस्तांतरित झाल्याच्या तारखेपर्यंत, आणि (iii) केंद्रीय संचय खात्यात हस्तांतरित केल्याच्या तारखेपासून विद्यार्थी/महाविद्यालयांच्या बँक खात्यात हस्तांतरित केल्याच्या तारखेपर्यंत लागणाऱ्या वेळेचे विश्लेषण केले. लेखापरीक्षणात खालील बाबी निदर्शनास आल्या.

- 2018-19 ते 2020-21, या कालावधीत इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत मंजूर आणि प्रदान केलेल्या 4.50 लाख अर्जांपैकी 1.08 लाख अर्जांच्या (24 *टक्के*) देयकांची निर्मिती एका महिन्याच्या कालावधीनंतर करण्यात आली. तसेच, 2018-19 ते 2020-21 या कालावधीत विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीअंतर्गत मंजूर झालेल्या आणि प्रदान केलेल्या 2.17 लाख अर्जांपैकी 0.72 लाख अर्जांच्या (33 *टक्के*) देयकांची निर्मिती एका महिन्याच्या कालावधीनंतर करण्यात आली. कालावधी-निहाय विश्लेषण **आलेख 2.3** मध्ये दर्शविले आहे आणि तपशील **परिशिष्ट 2.4** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 2.3: इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत देयक निर्मितीसाठी लागलेला कालावधी**





*स्त्रोत: महाआयटीने सादर केलेल्या माहितीचे विश्लेषण इमाव: इतर मागासवर्गीय; विजाभज: विमुक्त जाती भटक्या जमाती*

- आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना योजनेच्या विशिष्ट बँक खात्यात प्राप्त झालेला निधी केंद्रीय संचय खात्यात हस्तांतरित केला गेला. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की इतर मागासवर्गीय मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत, 2018-19 ते 2020-21 या कालावधीत 2.51 लाख मंजूर अर्जांच्या (55 *टक्के*) संदर्भातील

₹ 219.58 कोटी रक्कम 15 दिवसांच्या कालावधीनंतर केंद्रीय संचय खात्यात हस्तांतरित करण्यात आली. तसेच विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत 2018-19 ते 2020-21 या कालावधीत 0.97 लाख मंजूर अर्जांच्या (45 *टक्के*) संदर्भातील ₹ 197.72 कोटी रक्कम 15 दिवसांच्या कालावधीनंतर केंद्रीय संचय खात्यात हस्तांतरित करण्यात आली. कालावधी-निहाय विश्लेषण **आलेख 2.4** मध्ये दर्शविले आहे आणि तपशील **परिशिष्ट 2.5.** मध्ये दिले आहे.

**आलेख 2.4: इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत केंद्रीय संचय खात्यात निधी जमा करण्यासाठी लागलेला कालावधी**





*स्रोत : महाआयटीने सादर केलेल्या माहितीचे विश्लेषण इमाव: इतर मागासवर्गीय; विजाभज: विमुक्त जाती भटक्या जमाती*

- केंद्रीय संचय खात्यातील शिष्यवृत्तीची रक्कम सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या/महाविद्यालयांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात आली. लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर

शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत 2.80 लाख व्यवहारांबाबत (44 *टक्के)* ₹ 104.16 कोटी रकमेचा निधी केंद्रीय संचय खात्यात जमा झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीनंतर हस्तांतरित करण्यात आला. तसेच, विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत 1.24 लाख व्यवहारांबाबत (31 *टक्के*) ₹ 54.70 कोटी रकमेचा निधी केंद्रीय संचय खात्यात जमा झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीनंतर हस्तांतरित करण्यात आला. कालावधी-निहाय विश्लेषण **आलेख 2.5** मध्ये दर्शविले आहे आणि तपशील **परिशिष्ट 2.6.** मध्ये दिले आहेत.


**आलेख 2.5: इतर मागासवर्गीयांना व विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीअंतर्गत विद्यार्थी/महाविद्यालयांच्या बँक खात्यात शिष्यवृत्ती हस्तांतरित करण्यासाठी लागलेला कालावधी**




*स्रोत : महाआयटीने सादर केलेल्या माहितीचे विश्लेषण इमाव: इतर मागासवर्गीय; विजाभज: विमुक्त जाती भटक्या जमाती*

- लेखापरीक्षण विश्लेषणात असे निदर्शनास आले की, इतर मागासवर्गीयांना व विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीअंतर्गत एका शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्ती प्रदानाचा पहिला हप्ता पुढील वर्षांत दिला गेला जे **आलेख 2.6** मध्ये दर्शविले आहे. त्याचे तपशील **परिशिष्ट 2.7** मध्ये दिले आहेत.

**आलेख 2.6: एका शैक्षणिक वर्षातील प्रदान पुढील वर्षात करण्यात आले**




*स्रोत : महाआयटीने सादर केलेल्या माहितीचे विश्लेषण इमाव: इतर मागासवर्गीय; विजाभज: विमुक्त जाती भटक्या जमाती*

**आलेख 2.6** वरुन असे निदर्शनास येते की, शैक्षणिक वर्ष 2018-19 आणि 2019-20 साठीचे इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे अनुक्रमे 32 *टक्के* आणि 16 *टक्के* प्रदाने हे पुढील वर्षात झाले. तसेच, शैक्षणिक वर्ष 2018-19 आणि 2019-20 साठीचे विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे अनुक्रमे 47 *टक्के* आणि 23 *टक्के* प्रदाने ही पुढील वर्षात झाली.

चाचणी-तपासणी केलेल्या दोन योजनांतर्गत निधीचे संवितरण करण्यासाठी लागलेला कालावधी हे दर्शवितो की, थेट लाभ हस्तांतरणाची अंमलबजावणी होऊनही निधीच्या जलद संवितरणाचे परिकल्पित लाभ अर्जदार/महाविद्यालये यांना मिळत नव्हते.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की ते शिष्यवृत्त्यांच्या संवितरणासाठी लागणारा कालावधी कमी करण्याकरिता पर्यायांचा विचार करीत होते.

***शिफारस 5: शासनाने थेट लाभ हस्तांतरण प्रणालीचा वापर करून शिष्यवृत्तीच्या संवितरणासाठी लागणारा कालावधी कमी करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.***

### 2.4.9 शिष्यवृत्तीचे अतिरिक्त प्रदान

महाराष्ट्र विना-अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्काचे नियमन) अधिनियम, 2015 अंतर्गत विना-अनुदानित संस्थांनी आकारलेल्या शुल्काची तर्कसंगतता ठरविण्यासाठी शुल्क नियमन प्राधिकरणाची स्थापना (मार्च 2016) केली. एकदा शुल्क मान्य झाल्यावर, ते शुल्क नियमन प्राधिकरणाद्वारे वैयक्तिकरित्या संस्थांना तसेच शुल्क नियमन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर अपलोड केले जाते. शुल्क नियमन प्राधिकरणाद्वारे निश्चित केलेल्या शुल्कामध्ये इतर गोष्टींबरोबरच शिक्षण शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, परीक्षा शुल्क, विकास शुल्क किंवा अभ्यासक्रम किंवा सह-अभ्यासक्रमासाठी देय असलेली रक्कम आणि प्रयोगशाळा शुल्क यांचा समावेश होतो.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मार्च 2019 मधील परिपत्रक आणि फेब्रुवारी 2020 मधील शासन निर्णयाद्वारे "इतर शुल्क" मधील बाबींच्या वाढलेल्या संख्येला मान्यता मिळाल्याने "इतर शुल्क" चे 16 प्रकारांमध्ये वर्गीकरण केले आणि "इतर शुल्क" मधील 16 प्रकार महाडीबीटी पोर्टलद्वारे प्रदान करण्याचे ठरविले. महाविद्यालय/संस्था यांना 2018-19 पासून संबंधित सक्षम प्राधिकारी/प्राधिकारी/ प्रशासकीय विभाग यांच्या मंजुरीने 16 प्रवर्गांमधील घटक-निहाय "इतर शुल्क" अपलोड करण्याचे निर्देश दिले. पुढे असेही निर्देश दिले की, शुल्क नियमन प्राधिकरणाने निश्चित केलेले शुल्क "इतर शुल्क" प्रकारामध्ये समाविष्ट नसल्याची सुनिश्चिती संबंधित प्रशासकीय विभागांनी करावी.

अभिलेख्यांच्या छाननीतून असे निदर्शनास आले की विना-अनुदानित खाजगी संस्थांना शुल्क नियमन प्राधिकरणाद्वारे ठरविण्यात आलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क अदा

करण्यात आले होते. शुल्क नियमन प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कामध्ये सर्व शुल्कांचा समावेश होता. तथापि, शुल्क नियमन प्राधिकरणाने ठरवून दिलेल्यापेक्षा जास्त शुल्क "इतर शुल्क" अंतर्गत वेगळे शुल्क प्रदान केल्यामुळे शैक्षणिक वर्ष 2018-19 आणि 2019-20 साठी संस्था/विद्यार्थ्यांना ₹ 53.41 कोटी शिष्यवृत्तीचे अतिरिक्त प्रदान झाले. अतिरिक्त प्रदान हे सूचित करते की प्रणालीमध्ये व्यवसाय नियमानुसार योग्य प्रोग्राम चेंज नियंत्रणे नव्हती.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की ते संबंधित प्राधिकाऱ्यांच्या सूचनांच्या अधीन राहून शुल्क नियमन प्राधिकरणाला थेट लाभ हस्तांतरण प्रणालीसोबत एकत्रित करण्याच्या व्यवहार्यतेची तपासणी करीत आहेत आणि नंतर ते शुल्काच्या रकमेचा निर्णय घेण्यासाठी शुल्क नियमन प्राधिकरणाबरोबर, संबधित विभागांबरोबर आणि महाआयटीबरोबर बैठक आयोजित करतील.

***शिफारस 6: शासनाने चुकीचे प्रदान टाळण्यासाठी प्रोग्राम चेंज नियंत्रणे पुरेशी आहेत याची खात्री करावी.***

### 2.4.10 विदाच्या फेर-पडताळणी व्यवस्थेचा अभाव

इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या मंजुरीसाठी विविध पात्रता निकषांची पूर्तता करणे आवश्यक असते. महाडीबीटी पोर्टलने राज्य कोषागार, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली, जात वैधता समित्या, भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण, आपले सरकार सेवा पोर्टल आणि शुल्क नियमन प्राधिकरण यांसारख्या विविध प्राधिकरणांसोबत बहुविध एकत्रीकरण परिकल्पित केले होते. एकात्मिक ॲप्लीकेशन सुसंगत तंत्रज्ञान प्लॅटफॉर्मवर तयार केलेली लाईव्ह डेटा शेअरिंग क्षमता प्रदान करेल. महाडीबीटी पोर्टलला भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली आणि बीम्ससोबत जोडण्यात आले होते.

लेखापरीक्षेने चाचणी-तपासणी केलेल्या नऊ जिल्ह्यांमधील महाडीबीटी प्रणालीमध्ये प्रविष्ट माहितीची शासकीय विभागांनी ठेवलेल्या विविध विदासंचासोबत (डेटाबेस) फेर-पडताळणी केली ज्यात पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिल्यानुसार चाचणी-तपासणी केलेल्या दोन योजनांमधील अपात्र अर्जदारांना शिष्यवृत्ती दिल्याचे उघडकीस आले.

#### 2.4.10.1 मिळकतीचा दाखला

केंद्र/राज्य शासनाच्या वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, पालकांचे उत्पन्न वार्षिक एक लाखाच्या[3] वर नसावे या अटीच्या अधीन राहून विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी

[3] मार्च 2021 पासून प्रतिवर्ष ₹ दीड लाखापर्यंत वाढविले

पात्र होते. उत्पन्नाचा पुरावा म्हणून, विद्यार्थ्यांना राज्याच्या महसूल विभागाने जारी केलेले पालकांचे मिळकतीचे दाखले सादर करणे आवश्यक होते.

ही अट पूर्ण केली जात आहे की नाही हे तपासण्यासाठी आणि मिळकतीच्या दाखल्यामध्ये अर्जदाराच्या उत्पन्नाची स्थिती खऱ्या अर्थाने प्रतिबिंबीत होते की नाही हे तपासण्यासाठी, अर्जदाराचे पालक राज्य शासनाचे कर्मचारी होते किंवा राज्य शासनाचे निवृत्तीवेतनधारक होते, ह्याची लेखापरीक्षेने खात्री केली. यापैकी कोणत्याही अटींची पूर्तता झाल्यास वार्षिक उत्पन्न ₹ एक लाखाच्या वर असावे असे मोठ्या प्रमाणावर सूचित होते. यासाठी, अर्जदाराच्या पालकांच्या भ्रमणध्वनी क्रमांकाची, सामान्य भविष्य निर्वाह निधीचे कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांच्या भ्रमणध्वनी क्रमांकाशी तुलना करण्यात आली. जुळलेली माहिती त्यानंतर पालकांची नावे आणि कर्मचारी/निवृत्तीवेतनधारकांच्या नावांच्या अचूकतेसाठी प्रत्यक्ष फेर-पडताळणी केली गेली. विश्लेषणात अशी प्रकरणे उघडकीस आली जेथे अर्जदाराचे पालक एकतर कार्यरत राज्य शासकीय कर्मचारी होते किंवा निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक होते, जे **तक्ता 2.10** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 2.10: अर्जदारांचे पालक हे एकतर राज्य शासकीय कर्मचारी होते किंवा निवृत्तिवेतनधारक होते**

| तपशील | इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | | विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | |
|---|---|---|---|---|
| | प्रकरणांची संख्या | संवितरण झालेली शिष्यवृत्तीची रक्कम (₹ लाखात) | प्रकरणांची संख्या | संवितरण झालेली शिष्यवृत्तीची रक्कम (₹ लाखात) |
| **पालक महाराष्ट्र शासनाचे कार्यरत कर्मचारी** | 201 | 73.94 | 277 | 200.76 |
| **पालक महाराष्ट्र शासन निवृत्तीवेतनधारक/ कुटुंब निवृत्तीवेतनधारक** | 152 | 41.99 | 90 | 76.38 |
| **एकूण** | **353** | **115.93** | **367** | **277.14** |

*स्त्रोत: राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारकांचा तपशील आणि राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सामान्य भविष्य निर्वाह निधीचा तपशील, मुंबई आणि नागपूर येथील महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) कार्यालयातून प्राप्त केलेली माहिती*

**तक्ता 2.10** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 720 (353 + 367) मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती प्रदानाची प्रकरणे अशी होती ज्यात पालक एकतर महाराष्ट्र शासनाचे कर्मचारी होते किंवा निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक होते. अशाप्रकारे, अर्जदार उत्पन्न पात्रता निकष पूर्ण करतो हे सिद्ध करण्यास इतर उपलब्ध माहितीसोबत फेर-पडताळणी केल्याशिवाय केवळ मिळकतीच्या दाखल्यावर अवलंबून राहता कामा नये.

निर्गमन बैठकीदरम्यान, अतिरिक्त मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की पालक हे शासकीय कर्मचारी किंवा निवृत्तीवेतनधारक नसल्याबद्दलचे प्रतिज्ञापत्र उमेदवारांकडून सादर करणे अनिवार्य करण्यासाठी आवश्यक पाऊले उचलली जातील.

### 2.4.10.2 जातीचा दाखला

चाचणी-तपासणी केलेल्या दोन योजनांमध्ये अर्जदारांनी ज्या जातीसाठी शिष्यवृत्तीचा दावा केला आहे त्या जातीच्या सत्यतेची खात्री करण्यासाठी 2019-20 ते 2020-21 दरम्यान आपले सरकार सेवा पोर्टलद्वारे जारी केलेल्या जातीच्या दाखल्याची महाडीबीटीच्या विदाबरोबर फेर-पडताळणी करण्यात आली.

विश्लेषणातून असे उघडकीस आले की चाचणी-तपासणी केलेल्या नऊ जिल्ह्यांपैकी पाच जिल्ह्यांमध्ये 15 शिष्यवृत्ती अर्जांना[4] चुकीच्या/अपात्र जातीच्या दाखल्याच्या आधारावर शिष्यवृत्तीचे लाभ देण्यात आले. हे अर्जदार त्यांनी अपलोड केलेल्या जातीच्या दाखल्यानुसार ते सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गातील होते आणि त्यामुळे ते शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र नव्हते.

त्यानंतर, जिल्हा सहाय्यक आयुक्त, अहमदनगर यांनी दोन प्रकरणांमधून (लेखापरीक्षणात निदर्शनास आणलेले एक प्रकरण आणि त्याच विद्यार्थ्याची पुढील वर्षाची शिष्यवृत्ती) रक्कम वसूल (मार्च 2022) केली.

निर्गमन बैठकीदरम्यान, विभागप्रमुख, महाआयटी यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की सर्व शासकीय विदासंच (डेटाबेस) जोडण्यासाठी एक प्रकल्प परिकल्पित आहे जो लेखापरीक्षणात निदर्शनास आणलेल्या बाबींचे निराकरण करेल.

### 2.4.10.3 विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची आकडेवारी

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार (नोव्हेंबर 2003) विद्यार्थ्यांची उपस्थिती 75 *टक्के* असेल तरच शिष्यवृत्तीचे संवितरण करण्यात येणार होते.

लेखापरीक्षणाच्या निदर्शनास आले की, विद्यार्थ्यांच्या संदर्भात उपस्थितीची माहिती महाविद्यालये/संस्थांद्वारे प्रणालीमध्ये प्रविष्ट केली जात होती. महाडीबीटी प्रणालीसह बायोमॅट्रिक प्रणालीचे एकत्रीकरण न झाल्याने, प्रणालीमध्ये प्रविष्ट केलेल्या उपस्थितीच्या माहितीची अचूकता आणि विश्वासार्हता सुनिश्चित होऊ शकली नाही.

अतिरिक्त मुख्य सचिव, (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी स्थापन केलेल्या थेट लाभ हस्तांतरण कक्षाने निर्णय (मे 2018 आणि डिसेंबर 2018) घेतला की, विद्यार्थ्यांची उपस्थिती 50 टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास, शिष्यवृत्तीचा दुसरा आणि अंतिम हप्ता दिला जावा तर विद्यार्थ्याची उपस्थिती लक्षात न घेता, महाविद्यालये/संस्था यांच्या हिश्श्याचा हप्ता मुक्त करण्यात यावा. ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती 75 *टक्के* पेक्षा कमी होती, त्यांना दुसरा आणि अंतिम हप्ता देण्याचा थेट लाभ हस्तांतरण कक्षाचा निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा आणि विशेष सहाय्य विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयाचे उल्लंघन करणारा होता.

---

[4] अहमदनगर: एक; औरंगाबाद: पाच; नागपूर: एक; नाशिक: सहा आणि पुणे: दोन

महाआयटीने दिलेल्या माहितीनुसार, ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्षातील उपस्थिती 75 टक्क्यांपेक्षा कमी होती, अशा विद्यार्थी आणि संस्थांना 2018-19 ते 2020-21 या कालावधीत ₹ 93.29 कोटीच्या शिष्यवृत्तीचे प्रदान केले गेले, जे अनियमित होते.

निर्गमन बैठकीत अतिरिक्त मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागासोबत सल्लामसलत केली जाईल.

***शिफारस 7: महाडीबीटीमधील विदाची विश्वासार्हता सुधारण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांच्या बायोमॅट्रिक उपस्थितीसह विविध शासकीय संस्थांमध्ये विदा एकत्रीकरण सुनिश्चित करावे.***

## 2.5 योजनेचे संनियंत्रण

थेट लाभ हस्तांतरण शिष्यवृत्ती कार्यक्रम हा एक प्रमुख सामाजिक उपक्रम आहे, ज्यामध्ये लक्षणीय प्रमाणात खर्च केला गेला आहे, त्यात संनियंत्रण प्रणाली असणे आवश्यक आहे आणि त्याचा विविध हितसंबंधितांनी वापर केला पाहिजे. शिष्यवृत्ती कार्यक्रमाच्या संनियंत्रणासंदर्भात लेखापरीक्षणात खालील त्रुटी आढळून आल्या.

### 2.5.1 अपुरी संनियंत्रण यंत्रणा

#### 2.5.1.1 विभागाकडून योजनेच्या आर्थिक आणि भौतिक कामगिरीचे संनियंत्रण न करणे

इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती देण्यासंदर्भात भारत सरकारच्या 2018 च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, या योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची वर्ग-निहाय आणि लिंग-निहाय संख्या दर्शविणाऱ्या त्रैमासिक प्रगती अहवालाद्वारे योजनेच्या आर्थिक व भौतिक कामगिरीचे संनियंत्रण करण्यात येणार होते. आर्थिक बाजूच्या संनियंत्रणाकरिता मागील आर्थिक वर्षात झालेल्या प्रत्यक्ष खर्चाचा तपशील आणि चालू आर्थिक वर्षासाठी प्रस्तावित खर्चाचा तपशील संबंधित अभिकरणांनी सादर करणे आवश्यक होते.

इतर मागास वर्गीय बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन या संदर्भात कोणतेही अभिलेखे सादर करू शकले नाही, ज्यावरून, त्यांच्याकडे योजनेच्या संनियंत्रणाची कोणतीही यंत्रणा उपलब्ध नव्हती हे सूचित होते.

#### 2.5.1.2 शासकीय निर्देशांचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांकडून महाविद्यालये/संस्थांनी वसूल केलेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेवर संनियंत्रणाचा अभाव

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने जारी केलेल्या (जुलै 2004/मार्च 2012) शासन निर्णयानुसार, विना-अनुदानित संस्थांमध्ये शिकणारे इतर मागासवर्गीय विद्यार्थी 50 *टक्के* शिक्षण शुल्कासाठी पात्र होते. अनुदानित संस्थांमध्ये शिकणारे इतर

मागासवर्गीय विद्यार्थी आणि अनुदानित आणि विना-अनुदानित संस्थांमध्ये शिकणारे विमुक्त जाती भटक्या जमातीचे विद्यार्थी 100 *टक्के* शिक्षण शुल्कासाठी पात्र होते.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाने शासन निर्णयाद्वारे (ऑक्टोबर 2017) विहित केले होते की, प्रवेशाच्या वेळी संस्थांनी इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क वसूल करू नये.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, निर्देश जारी करूनही महाविद्यालये/संस्था विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क वसूल करीत होते. शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ति त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केली जावी, यासाठी शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना विद्यार्थी शिक्षण शुल्काची पावती अपलोड करीत होते. अशाप्रकारे, शासकीय निर्देशांचे उल्लंघन करून, सुरुवातीलाच शिक्षण शुल्क भरण्याचे ओझे विद्यार्थ्यांवर पडते. विद्यार्थ्यांना शुल्काचा परतावा केल्याचे कोणतेही अभिलेख उपलब्ध नव्हते.

ह्यावरून असे देखील सूचित होते की, शासकीय निर्देशांचे उल्लंघन करून, विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क वसूल करणाऱ्या संस्थांची निश्चिती करून इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन हे योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे संनियंत्रित करीत नव्हते. महाडीबीटी प्रणालीसुद्धा अशा संस्था निश्चित करण्यासाठी अहवाल तयार करीत नव्हती.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी आश्वासित केले (डिसेंबर 2022) की, अर्जांचे पर्यवेक्षण व यादृच्छिक तपासणीकरिता संचालनालय स्तरावर समिती स्थापन केली जाईल.

### 2.5.2 अंतर्गत लेखापरीक्षण यंत्रणेचा अभाव

विभागाच्या अंतर्गत नियंत्रण यंत्रणेच्या पर्याप्ततेवर वाजवी आश्वासन देण्याकरिता विभागीय नियम आणि प्रक्रियांच्या अनुपालनाचे स्तर तपासण्यासाठी आणि मूल्यांकन करण्यासाठी अंतर्गत लेखापरीक्षण केले जाते. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सर्व शासकीय विभागांना त्यांच्या अंतर्गत नियंत्रण यंत्रणेचा आढावा घेण्याचा आणि अंतर्गत लेखापरीक्षण नियमितपणे पार पडेल याची खात्री करण्याचे निर्देश (जानेवारी 2007) दिले. जेथे अंतर्गत लेखापरीक्षणासाठी स्वतंत्र शाखा नव्हती, त्या विभागांना स्वतंत्र अंतर्गत लेखापरीक्षण शाखा स्थापन करावयाची होती, ज्यासाठी कर्मचारी प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविणे आवश्यक होते.

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय आणि विशेष मागासवर्गीयांच्या योजना प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने राबविण्याच्या उद्देशाने इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्थापना मार्च 2017 मध्ये करण्यात आली. तथापि, स्थापना होऊन पाच वर्षे उलटून गेल्यानंतरही अंतर्गत लेखापरीक्षण शाखा स्थापित झालेली नाही अथवा विभागाअंतर्गत कार्यालयांचे अंतर्गत लेखापरीक्षण देखील झालेले नाही.

निर्गमन बैठकीत अतिरिक्त मुख्य सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की विभागामध्ये असे कोणतेही क्षेत्र नव्हते जेथे अंतर्गत

लेखापरीक्षण अनिवार्य होते आणि अंतर्गत लेखापरीक्षणाची अट शिथिल करण्याविषयी वित्त विभागाकडे संपर्क केला जाईल.

ही वस्तुस्थिती कायम राहते की, शासकीय नियम आणि विनियमन यांचे विभागांकडून केल्या जाणाऱ्या अनुपालनाचे मूल्यमापन निर्धारित करणे आणि त्यासंबंधी अहवाल देणे यामध्ये अंतर्गत लेखापरीक्षणाची महत्त्वपूर्ण आणि मोठी भूमिका आहे.

### 2.5.3 सामायिक संचय खात्यात पडून असलेली असंवितरीत रक्कम

केंद्रीय संचय खात्यातील निधी विद्यार्थी/संस्थांच्या बँक खात्यांमध्ये हस्तांतरित केला जातो. लेखापरीक्षेच्या छाननीत सामायिक संचय खात्यात पडून असलेला निधी वितरित न झाल्याचे उघड झाले, जे **तक्ता 2.11** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 2.11: वर्ष-निहाय संवितरित न झालेली रक्कम**

**(₹ लाखात)**

| वर्ष | योजनेचे नाव | संवितरित न झालेली रक्कम | |
|---|---|---|---|
| | | विद्यार्थी | महाविद्यालये /संस्था |
| 2018-19 | इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 133.69 | 10.75 |
| | विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 72.63 | 5.51 |
| 2019-20 | इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 258.71 | 27.15 |
| | विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 153.54 | 43.62 |
| 2020-21 | इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 199.30 | 71.28 |
| | विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 105.46 | 112.32 |
| **एकूण** | | **923.33** | **270.63** |

*स्रोत: महाआयटीने सादर केलेली माहिती*

**तक्ता 2.11** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, केंद्रीय संचय खात्यात ₹ 11.94 कोटी संवितरित न होता पडून होते. संवितरण न झाल्याची कारणे लाभार्थ्यांची दुबार नावे, बँकेचे नाव सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली बँक मास्टरनुसार नसणे, खाते बंद, लाभार्थी नोंदणी प्रतिसाद प्रलंबित, बँक खाते क्रमांक अवैध असल्याने बँकेने नाकारणे, अवैध बँक/पोस्ट ऑफिस शाखा इत्यादि होती. अवैध बँक/पोस्ट ऑफिस शाखेमुळे खात्यावरील व्यवहार अयशस्वी होणे, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीमध्ये अवैध म्हणून चिन्हांकित केलेले खाते क्रमांक आणि जोडले नसलेले आधार क्रमांक इत्यादींमुळे ₹ 11.94 कोटीपैकी ₹ सात कोटी, संवितरित न होता पडून होते. तसेच, डिसेंबर 2018

ते सप्टेंबर 2021 पर्यंत केंद्रीय संचय खात्यातील रकमेवर मिळालेले ₹ 36.32 कोटी व्याज राज्याच्या एकत्रित निधीत जमा केले नव्हते.

हे इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे अपुरे संनियंत्रण दर्शविते ज्यात केंद्रीय संचय खात्यात प्रदीर्घ काळ पडून असलेल्या संवितरित रकमेच्या परताव्यासाठी ना धोरण/मार्गदर्शक तत्त्वे तयार केली, ना समस्यांच्या निराकरणासाठी पाऊले उचलली, ज्याच्या परिणामी लाभार्थ्यांना निधीचे वितरण होऊ शकले नाही.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी सांगितले (डिसेंबर 2022) की संवितरण न होण्याची कारणे लेखापरीक्षेला दिली जातील.

**(पी. वी. हरि कृष्णा)**

मुंबई, महालेखाकार (लेखापरीक्षा)-I,

दिनांक : 05 जुलै 2023 महाराष्ट्र, मुंबई

प्रतिस्वाक्षरित

**(गिरीश चंद्र मुर्मू)**

नवी दिल्ली, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

दिनांक : 06 जुलै 2023

# परिशिष्टे

**परिशिष्ट 2.1**

**(संदर्भ: परिच्छेद 2.1)**

**शिष्यवृत्ती अर्ज आणि संवितरणाचा तपशील**

| योजना | शैक्षणिक वर्ष | प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या | विभागाने संमत केलेल्या अर्जांची संख्या | पहिला हप्ता संवितरीत झालेल्या अर्जांची संख्या | दुसरा हप्ता संवितरीत झालेल्या अर्जांची संख्या | संवितरीत झालेली एकूण रक्कम (विद्यार्थ्यांची रक्कम+ संस्थांची रक्कम) (₹ कोटीमध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|
| इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 2018-19 | 6,78,770 | 5,25,588 | 5,09,437 | 5,04,012 | 747.94 |
| | 2019-20 | 5,88,696 | 5,08,746 | 4,89,632 | 4,83,628 | 716.13 |
| | 2020-21 | 6,25,861 | 5,37,785 | 5,14,790 | 4,94,832 | 809.10 |
| विमुक्त जाती भटक्या जमाती श्रेणीतील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | 2018-19 | 2,88,044 | 2,21,675 | 2,11,259 | 2,08,216 | 507.07 |
| | 2019-20 | 2,52,544 | 2,16,897 | 2,04,084 | 2,00,345 | 522.47 |
| | 2020-21 | 2,59,460 | 2,21,917 | 2,11,430 | 2,04,556 | 640.31 |
| *स्त्रोत: महाडीबीटी पोर्टलवरून संकलित केलेल्या माहितीनुसार* | | | | | | |

**परिशिष्ट 2.2**

**(संदर्भ: परिच्छेद 2.4.3)**

**20 किंवा त्यापेक्षा जास्त अर्जांना जोडलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकांची उदाहरणात्मक प्रकरणे**

| अनु क्रमांक | अर्ज ओळखपत्र | भ्रमणध्वनी क्रमांक | अनुक्रमांक | अर्ज ओळखपत्र | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| **इतर मागासवर्गीय अर्ज** | | | | | |
| 1 | 1819व्हीजेओ1000754985 | 7020710XXX | 21 | 1920व्हीजेओ1000990894 | 7498649XXX |
| 2 | 1819व्हीजेओ1000347699 | 7020710XXX | 22 | 1920व्हीजेओ1001111079 | 7498649XXX |
| 3 | 1819व्हीजेओ1000274312 | 7020710XXX | 23 | 1920व्हीजेओ1000639474 | 7498649XXX |
| 4 | 1819व्हीजेओ1000713195 | 7020710XXX | 24 | 1920व्हीजेओ1000698607 | 7498649XXX |
| 5 | 1819व्हीजेओ1000566463 | 7020710XXX | 25 | 1920व्हीजेओ1000026231 | 7498649XXX |
| 6 | 1819व्हीजेओ1000740777 | 7020710XXX | 26 | 1920व्हीजेओ1001311454 | 7498649XXX |
| 7 | 1819व्हीजेओ1000730548 | 7020710XXX | 27 | 1920व्हीजेओ1000414509 | 7498649XXX |
| 8 | 1819व्हीजेओ1000682152 | 7020710XXX | 28 | 1920व्हीजेओ1001475148 | 7498649XXX |
| 9 | 1819व्हीजेओ1000781949 | 7020710XXX | 29 | 1920व्हीजेओ1001250705 | 7498649XXX |
| 10 | 1819व्हीजेओ1000586576 | 7020710XXX | 30 | 1920व्हीजेओ1001172016 | 7498649XXX |
| 11 | 1819व्हीजेओ1000626774 | 7020710XXX | 31 | 1920व्हीजेओ1001526056 | 7498649XXX |
| 12 | 1819व्हीजेओ1000685842 | 7020710XXX | 32 | 1920व्हीजेओ1001308682 | 7498649XXX |
| 13 | 1819व्हीजेओ1000271523 | 7020710XXX | 33 | 1920व्हीजेओ1000476854 | 7498649XXX |
| 14 | 1819व्हीजेओ1000339134 | 7020710XXX | 34 | 1920व्हीजेओ1001263717 | 7498649XXX |
| 15 | 1819व्हीजेओ1000715485 | 7020710XXX | 35 | 1920व्हीजेओ1000990515 | 7498649XXX |
| 16 | 1819व्हीजेओ1000754965 | 7020710XXX | 36 | 1920व्हीजेओ1001496092 | 7498649XXX |
| 17 | 1819व्हीजेओ1000730396 | 7020710XXX | 37 | 1920व्हीजेओ1001064708 | 7498649XXX |
| 18 | 1819व्हीजेओ1000713665 | 7020710XXX | 38 | 1920व्हीजेओ1001054375 | 7498649XXX |
| 19 | 1819व्हीजेओ1000324658 | 7020710XXX | 39 | 1920व्हीजेओ1000615937 | 7498649XXX |
| 20 | 1819व्हीजेओ1000693268 | 7020710XXX | 40 | 1920व्हीजेओ1001180255 | 7498649XXX |
| **विमुक्त जाती भटक्या जमाती श्रेणीतील अर्ज** | | | | | |
| 1 | 1920व्हीजेव्ही1000397956 | 9011157XXX | 21 | 2021व्हीजेव्ही1000722597 | 8275219XXX |
| 2 | 1920व्हीजेव्ही1000340063 | 9011157XXX | 22 | 2021व्हीजेव्ही1000775265 | 8275219XXX |
| 3 | 1920व्हीजेव्ही1000316763 | 9011157XXX | 23 | 2021व्हीजेव्ही1000616089 | 8275219XXX |
| 4 | 1920व्हीजेव्ही1000154088 | 9011157XXX | 24 | 2021व्हीजेव्ही1000810836 | 8275219XXX |
| 5 | 1920व्हीजेव्ही1000430465 | 9011157XXX | 25 | 2021व्हीजेव्ही1000489897 | 8275219XXX |
| 6 | 1920व्हीजेव्ही1000012824 | 9011157XXX | 26 | 2021व्हीजेव्ही1000731052 | 8275219XXX |
| 7 | 1920व्हीजेव्ही1000306765 | 9011157XXX | 27 | 2021व्हीजेव्ही1000659386 | 8275219XXX |
| 8 | 1920व्हीजेव्ही1000064171 | 9011157XXX | 28 | 2021व्हीजेव्ही1000689625 | 8275219XXX |
| 9 | 1920व्हीजेव्ही1000013743 | 9011157XXX | 29 | 2021व्हीजेव्ही1000704713 | 8275219XXX |
| 10 | 1920व्हीजेव्ही1000452367 | 9011157XXX | 30 | 2021व्हीजेव्ही1000632282 | 8275219XXX |
| 11 | 1920व्हीजेव्ही1000208774 | 9011157XXX | 31 | 2021व्हीजेव्ही1000702502 | 8275219XXX |
| 12 | 1920व्हीजेव्ही1000334139 | 9011157XXX | 32 | 2021व्हीजेव्ही1000759777 | 8275219XXX |
| 13 | 1920व्हीजेव्ही1000438088 | 9011157XXX | 33 | 021व्हीजेव्ही10007363022 | 8275219XXX |
| 14 | 1920व्हीजेव्ही1000014176 | 9011157XXX | 34 | 2021व्हीजेव्ही1000459079 | 8275219XXX |
| 15 | 1920व्हीजेव्ही1000441974 | 9011157XXX | 35 | 2021व्हीजेव्ही1000656097 | 8275219XXX |

| अनु क्रमांक | अर्ज ओळखपत्र | भ्रमणध्वनी क्रमांक | अनुक्रमांक | अर्ज ओळखपत्र | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 16 | 1920व्हीजेव्ही1000220648 | 9011157XXX | 36 | 2021व्हीजेव्ही1000078721 | 8275219XXX |
| 17 | 1920व्हीजेव्ही1000411459 | 9011157XXX | 37 | 2021व्हीजेव्ही1000085241 | 8275219XXX |
| 18 | 1920व्हीजेव्ही1000384343 | 9011157XXX | 38 | 2021व्हीजेव्ही1000537286 | 8275219XXX |
| 19 | 1920व्हीजेव्ही1000410665 | 9011157XXX | 39 | 2021व्हीजेव्ही1000769469 | 8275219XXX |
| 20 | 1920व्हीजेव्ही1000213593 | 9011157XXX | 40 | 2021व्हीजेव्ही1000750994 | 8275219XXX |

*स्त्रोत: महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी लिमिटेड यांनी सादर केलेल्या विदाचे विश्लेषण*

**परिशिष्ट 2.3**

**(संदर्भ: परिच्छेद 2.4.5)**

**देयक निर्मितीच्या वेळी फर्स्ट इन फर्स्ट आऊट पद्धतीचे उल्लंघन दर्शविणारी उदाहरणात्मक प्रकरणे**

| अनु क्रमांक | जात | मंजुरीचे वित्तीय वर्ष | अर्ज क्रमांक | बॅच ओळखपत्र | अर्ज मंजुरीची तारीख | देयक निर्मितीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | इतर मागासवर्गीय | 2018-19 | 1819व्हीजेओ1000271615 | 889602664 | 23-11-2018 | 25-02-2019 |
| 2 | | | 1819व्हीजेओ1000310573 | 889602664 | 23-11-2018 | 25-02-2019 |
| 3 | | | 1819व्हीजेओ1000362412 | 889602664 | 23-11-2018 | 25-02-2019 |
| 4 | | | 1819व्हीजेओ1000274146 | 439269755 | 23-11-2018 | 02-03-2019 |
| 5 | | | 1819व्हीजेओ1000076258 | 229315105 | 24-11-2018 | 20-12-2018 |
| 6 | | | 1819व्हीजेओ1000084164 | 229315105 | 24-11-2018 | 20-12-2018 |
| 7 | | | 1819व्हीजेओ1000188245 | 229315105 | 24-11-2018 | 20-12-2018 |
| 8 | | | 1819व्हीजेओ1000211463 | 229315105 | 24-11-2018 | 20-12-2018 |
| 9 | | | 1819व्हीजेओ1000473253 | 229315105 | 18-12-2018 | 20-12-2018 |
| 10 | | | 1819व्हीजेओ1000484144 | 229315105 | 18-12-2018 | 20-12-2018 |
| 11 | | | 1819व्हीजेओ1000081652 | 229315105 | 18-12-2018 | 20-12-2018 |
| 12 | | | 1819व्हीजेओ1000303634 | 867899063 | 18-12-2018 | 05-02-2019 |
| 13 | | | 1819व्हीजेओ1000426259 | 625625310 | 18-12-2018 | 05-02-2019 |
| 14 | | | 1819व्हीजेओ1000010109 | 229315105 | 19-12-2018 | 20-12-2018 |
| 15 | | | 1819व्हीजेओ1000129375 | 229315105 | 19-12-2018 | 20-12-2018 |
| 16 | | | 1819व्हीजेओ1000324488 | 229315105 | 19-12-2018 | 20-12-2018 |
| 17 | | | 1819व्हीजेओ1000333236 | 229315105 | 19-12-2018 | 20-12-2018 |
| 18 | | | 1819व्हीजेओ1000366066 | 229315105 | 19-12-2018 | 20-12-2018 |
| 19 | | | 1819व्हीजेओ1000582764 | 135859601 | 18-01-2019 | 19-07-2019 |
| 20 | | | 1819व्हीजेओ1000736025 | 135859601 | 18-01-2019 | 19-07-2019 |
| 21 | | | 1819व्हीजेओ1000586269 | 117728315 | 18-01-2019 | 20-11-2019 |
| 22 | | | 1819व्हीजेओ1000631906 | 193678983 | 18-01-2019 | 22-11-2019 |
| 23 | | | 1819व्हीजेओ1000408377 | 389363051 | 19-01-2019 | 29-01-2019 |
| 24 | | 2019-20 | 1819व्हीजेओ1000901467 | 135859601 | 21-05-2019 | 19-07-2019 |
| 25 | | | 1819व्हीजेओ1000928279 | 135859601 | 21-05-2019 | 19-07-2019 |
| 26 | | | 1819व्हीजेओ1000218683 | 266187344 | 21-05-2019 | 21-09-2019 |
| 27 | | | 1819व्हीजेओ1000221142 | 266187344 | 21-05-2019 | 21-09-2019 |
| 28 | | | 1819व्हीजेओ1000205894 | 135859601 | 22-05-2019 | 19-07-2019 |
| 29 | | | 1819व्हीजेओ1000208815 | 135859601 | 22-05-2019 | 19-07-2019 |
| 30 | | | 1819व्हीजेओ1000870198 | 135859601 | 03-07-2019 | 19-07-2019 |
| 31 | | | 1819व्हीजेओ1000879346 | 135859601 | 03-07-2019 | 19-07-2019 |
| 32 | | | 1819व्हीजेओ1000907655 | 135859601 | 03-07-2019 | 19-07-2019 |
| 33 | | | 1819व्हीजेओ1000885348 | 266187344 | 03-07-2019 | 21-09-2019 |
| 34 | | | 1819व्हीजेओ1000019351 | 135859601 | 04-07-2019 | 19-07-2019 |
| 35 | | | 1819व्हीजेओ1000884898 | 135859601 | 04-07-2019 | 19-07-2019 |
| 36 | | | 1819व्हीजेओ1000879477 | 135859601 | 05-07-2019 | 19-07-2019 |
| 37 | | | 1920व्हीजेओ1001299132 | 666164555 | 01-11-2019 | 06-12-2019 |
| 38 | | | 1920व्हीजेओ1001326396 | 666164555 | 01-11-2019 | 06-12-2019 |

| अनु क्रमांक | जात | मंजुरीचे वित्तीय वर्ष | अर्ज क्रमांक | बॅच ओळखपत्र | अर्ज मंजुरीची तारीख | देयक निर्मितीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| 39 | इतर मागासवर्गीय | 2019-20 | 1920व्हीजेओ1001170498 | 204987425 | 01-11-2019 | 23-11-2020 |
| 40 | | | 1920व्हीजेओ1000083615 | 7438315 | 02-11-2019 | 27-11-2019 |
| 41 | | | 1920व्हीजेओ1000176863 | 7438315 | 02-11-2019 | 27-11-2019 |
| 42 | | | 1920व्हीजेओ1000229007 | 7438315 | 02-11-2019 | 27-11-2019 |
| 43 | | 2020-21 | 1920व्हीजेओ1001671412 | 204987425 | 28-05-2020 | 23-11-2020 |
| 44 | | | 1920व्हीजेओ1001672192 | 204987425 | 28-05-2020 | 23-11-2020 |
| 45 | | | 1920व्हीजेओ1001672222 | 204987425 | 28-05-2020 | 23-11-2020 |
| 46 | | | 1920व्हीजेओ1000000515 | 453532366 | 29-05-2020 | 26-10-2020 |
| 47 | | | 1920व्हीजेओ1000012331 | 453532366 | 29-05-2020 | 26-10-2020 |
| 48 | | | 1920व्हीजेओ1000021427 | 453532366 | 29-05-2020 | 26-10-2020 |
| 49 | | | 1920व्हीजेओ1000023782 | 453532366 | 29-05-2020 | 26-10-2020 |
| 50 | | | 1920व्हीजेओ1001305288 | 204987425 | 01-06-2020 | 23-11-2020 |
| 51 | | | 1920व्हीजेओ1001526977 | 204987425 | 01-06-2020 | 23-11-2020 |
| 52 | | | 1920व्हीजेओ1001566622 | 204987425 | 01-06-2020 | 23-11-2020 |
| 53 | | | 1920व्हीजेओ1000362329 | 414150843 | 02-06-2020 | 11-11-2020 |
| 54 | | | 1920व्हीजेओ1000472949 | 414150843 | 02-06-2020 | 11-11-2020 |
| 55 | | | 1920व्हीजेओ1000722074 | 414150843 | 02-06-2020 | 11-11-2020 |
| 56 | | | 1920व्हीजेओ1001305288 | 204987425 | 01-06-2020 | 23-11-2020 |
| 57 | | | 2021व्हीजेओ1002042376 | 233245013 | 01-03-2021 | 31-03-2021 |
| 58 | | | 2021व्हीजेओ1002062262 | 233245013 | 01-03-2021 | 31-03-2021 |
| 59 | | | 2021व्हीजेओ1002101932 | 233245013 | 01-03-2021 | 31-03-2021 |
| 60 | | | 2021व्हीजेओ1001373743 | 891475323 | 02-03-2021 | 27-03-2021 |
| 61 | | | 2021व्हीजेओ1001375929 | 891475323 | 02-03-2021 | 27-03-2021 |
| 62 | | | 2021व्हीजेओ1001378939 | 891475323 | 02-03-2021 | 27-03-2021 |
| 63 | विमुक्त जाती भटक्या जमाती | 2018-19 | 1819व्हीजेव्ही1000212019 | 224090862 | 01-12-2018 | 01-02-2019 |
| 64 | | | 1819व्हीजेव्ही1000197515 | 589568137 | 01-12-2018 | 05-02-2019 |
| 65 | | | 1819व्हीजेव्ही1000201572 | 589568137 | 01-12-2018 | 05-02-2019 |
| 66 | | | 1819व्हीजेव्ही1000011216 | 49971641 | 04-12-2018 | 20-12-2018 |
| 67 | | | 1819व्हीजेव्ही1000023806 | 49971641 | 04-12-2018 | 20-12-2018 |
| 68 | | | 1819व्हीजेव्ही1000030072 | 49971641 | 04-12-2018 | 20-12-2018 |
| 69 | | | 1819व्हीजेव्ही1000242609 | 399161145 | 18-01-2019 | 22-11-2019 |
| 70 | | | 1819व्हीजेव्ही1000246394 | 399161145 | 18-01-2019 | 22-11-2019 |
| 71 | | | 1819व्हीजेव्ही1000198844 | 46100461 | 18-01-2019 | 18-12-2019 |
| 72 | | | 1819व्हीजेव्ही1000006746 | 607341316 | 19-01-2019 | 23-01-2019 |
| 73 | | | 1819व्हीजेव्ही1000006803 | 607341316 | 19-01-2019 | 23-01-2019 |
| 74 | | | 1819व्हीजेव्ही1000006817 | 607341316 | 19-01-2019 | 23-01-2019 |
| 75 | | | 1819व्हीजेव्ही1000031291 | 420313032 | 28-01-2019 | 19-07-2019 |
| 76 | | | 1819व्हीजेव्ही1000067092 | 901638912 | 28-01-2019 | 21-09-2019 |
| 77 | | | 1819व्हीजेव्ही1000265935 | 46100461 | 28-01-2019 | 18-12-2019 |
| 78 | | | 1819व्हीजेव्ही1000019928 | 224090862 | 29-01-2019 | 01-02-2019 |
| 79 | | | 1819व्हीजेव्ही1000028682 | 224090862 | 29-01-2019 | 01-02-2019 |

| अनु क्रमांक | जात | मंजुरीचे वित्तीय वर्ष | अर्ज क्रमांक | बॅच ओळखपत्र | अर्ज मंजुरीची तारीख | देयक निर्मितीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| 80 | विमुक्त जाती भटक्या जमाती | 2018-19 | 1819व्हीजेव्ही1000032109 | 224090862 | 29-01-2019 | 01-02-2019 |
| 81 | | 2019-20 | 1819व्हीजेव्ही1000364035 | 901638912 | 13-07-2019 | 21-09-2019 |
| 82 | | | 1819व्हीजेव्ही1000381087 | 901638912 | 13-07-2019 | 21-09-2019 |
| 83 | | | 1819व्हीजेव्ही1000377725 | 493584617 | 13-07-2019 | 20-11-2019 |
| 84 | | | 1920व्हीजेव्ही1000000931 | 447118231 | 25-09-2019 | 06-12-2019 |
| 85 | | | 1920व्हीजेव्ही1000001021 | 447118231 | 25-09-2019 | 06-12-2019 |
| 86 | | | 1920व्हीजेव्ही1000001179 | 447118231 | 25-09-2019 | 06-12-2019 |
| 87 | | | 1920व्हीजेव्ही1000227256 | 447118231 | 16-10-2019 | 06-12-2019 |
| 88 | | | 1920व्हीजेव्ही1000285692 | 447118231 | 16-10-2019 | 06-12-2019 |
| 89 | | | 1920व्हीजेव्ही1000013622 | 456662170 | 17-10-2019 | 02-12-2019 |
| 90 | | | 1920व्हीजेव्ही1000018423 | 456662170 | 17-10-2019 | 02-12-2019 |
| 91 | | | 1920व्हीजेव्ही1000023415 | 456662170 | 17-10-2019 | 02-12-2019 |
| 92 | | | 1920व्हीजेव्ही1000339356 | 447118231 | 23-10-2019 | 06-12-2019 |
| 93 | | | 1920व्हीजेव्ही1000342446 | 447118231 | 23-10-2019 | 06-12-2019 |
| 94 | | | 1920व्हीजेव्ही1000010368 | 918844522 | 23-10-2019 | 22-01-2021 |
| 95 | | | 1920व्हीजेव्ही1000013477 | 918844522 | 23-10-2019 | 22-01-2021 |
| 96 | | | 1920व्हीजेव्ही1000013654 | 918844522 | 23-10-2019 | 22-01-2021 |
| 97 | | | 1920व्हीजेव्ही1000019279 | 447118231 | 24-10-2019 | 06-12-2019 |
| 98 | | | 1920व्हीजेव्ही1000025159 | 447118231 | 24-10-2019 | 06-12-2019 |
| 99 | | | 1920व्हीजेव्ही1000074933 | 447118231 | 24-10-2019 | 06-12-2019 |
| 100 | | 2020-21 | 2021व्हीजेव्ही1000459875 | 767919640 | 18-01-2021 | 31-03-2021 |
| 101 | | | 2021व्हीजेव्ही1000460693 | 767919640 | 18-01-2021 | 31-03-2021 |
| 102 | | | 2021व्हीजेव्ही1000462265 | 767919640 | 18-01-2021 | 31-03-2021 |
| 103 | | | 2021व्हीजेव्ही1000410373 | 684842797 | 22-01-2021 | 26-03-2021 |
| 104 | | | 2021व्हीजेव्ही1000436363 | 684842797 | 22-01-2021 | 26-03-2021 |
| 105 | | | 2021व्हीजेव्ही1000451509 | 684842797 | 22-01-2021 | 26-03-2021 |
| 106 | | | 2021व्हीजेव्ही1000731616 | 767919640 | 14-03-2021 | 31-03-2021 |
| 107 | | | 2021व्हीजेव्ही1000733806 | 767919640 | 14-03-2021 | 31-03-2021 |
| 108 | | | 2021व्हीजेव्ही1000733916 | 767919640 | 14-03-2021 | 31-03-2021 |
| 109 | | | 2021व्हीजेव्ही1000465259 | 684842797 | 15-03-2021 | 26-03-2021 |
| 110 | | | 2021व्हीजेव्ही1000077681 | 684842797 | 15-03-2021 | 26-03-2021 |
| 111 | | | 2021व्हीजेव्ही1000091681 | 684842797 | 15-03-2021 | 26-03-2021 |

*स्त्रोत: महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी लिमिटेड यांनी सादर केलेल्या विदाचे विश्लेषण*

### परिशिष्ट 2.4
### (संदर्भ: परिच्छेद 2.4.8 आणि आलेख 2.3)
### इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत देयक निर्मितीस लागलेला कालावधी

(₹ कोटीमध्ये)

| अर्ज मंजुरीचे वर्ष | देयक निर्मितीस लागलेला कालावधी | | | | | | | | अर्जांची एकूण संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 महिन्यापर्यंत | | > 1-3 महिने | | > 3-6 महिने | | > 6 महिने | | | |
| | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | | |
| **इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत देयक निर्मितीस लागलेला कालावधी** | | | | | | | | | | |
| 2018-19 | 165749 | 145.57 | 22173 | 14.11 | 7723 | 4.46 | 3246 | 1.41 | 198891 | 165.55 |
| 2019-20 | 130956 | 139.40 | 14115 | 13.24 | 1235 | 0.86 | 45322 | 9.72 | 191628 | 163.23 |
| 2020-21 | 45368 | 44.82 | 3733 | 4.09 | 9025 | 10.15 | 992 | 1.23 | 59118 | 60.29 |
| **एकूण** | **342073** | **329.79** | **40021** | **31.44** | **17983** | **15.48** | **49560** | **12.36** | **449637** | **389.06** |
| **भटक्या जाती विमुक्त जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत देयक निर्मितीस लागलेला कालावधी** | | | | | | | | | | |
| 2018-19 | 61969 | 82.62 | 26411 | 48.13 | 3801 | 4.43 | 779 | 0.67 | 92960 | 135.85 |
| 2019-20 | 54550 | 110.52 | 4420 | 6.98 | 236 | 0.18 | 30284 | 22.24 | 89490 | 139.92 |
| 2020-21 | 28270 | 53.91 | 1727 | 4.2 | 617 | 0.53 | 3723 | 7.23 | 34337 | 65.87 |
| **एकूण** | **144789** | **247.05** | **32558** | **59.31** | **4654** | **5.14** | **34786** | **30.14** | **216787** | **341.64** |

*स्त्रोत: महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी लिमिटेड यांनी सादर केलेल्या विदाचे विश्लेषण*

## परिशिष्ट 2.5

**(संदर्भ: परिच्छेद 2.4.8 आणि आलेख 2.4)**

**इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत केंद्रीय संचय खात्यात निधी जमा होण्यास लागलेला कालावधी**

**(₹ कोटीमध्ये)**

| देयक निर्मितीचे वर्ष | केंद्रीय संचय खात्यात जमा होण्यास लागलेला कालावधी | | | | | | | | अर्जांची एकूण संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 15 दिवसांपर्यंत | | > 15 दिवस ते 1 महिना | | > 1-2महिने | | > 2 महिने | | | |
| | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | अर्जांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | | |
| **इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत केंद्रीय संचय खात्यात निधी जमा होण्यास लागलेला कालावधी** | | | | | | | | | | |
| 2018-19 | 142809 | 128.90 | 22372 | 14.75 | 18718 | 12.30 | | | 183899 | 155.95 |
| 2019-20 | 42445 | 35.15 | 110995 | 122.88 | 7867 | 5.08 | | | 161307 | 163.11 |
| 2020-21 | 13134 | 5.43 | 1779 | 0.70 | 67805 | 41.32 | 21713 | 22.55 | 104431 | 70.00 |
| **एकूण** | **198388** | **169.48** | **135146** | **138.33** | **94390** | **58.7** | **21713** | **22.55** | **449637** | **389.06** |
| **विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती केंद्रीय संचय खात्यात निधी जमा होण्यास लागलेला कालावधी** | | | | | | | | | | |
| 2018-19 | 58224 | 76.85 | 1811 | 2.89 | 3284 | 4.30 | | | 63319 | 84.04 |
| 2019-20 | 26680 | 36.77 | 54664 | 114.16 | 114 | 0.10 | 7391 | 18.46 | 88849 | 169.49 |
| 2020-21 | 35247 | 30.29 | 612 | 0.22 | 1317 | 2.16 | 27443 | 55.43 | 64619 | 88.10 |
| **एकूण** | **120151** | **143.91** | **57087** | **117.27** | **4715** | **6.56** | **34834** | **73.89** | **216787** | **341.63** |

*स्त्रोत: महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी लिमिटेड यांनी सादर केलेल्या विदाचे विश्लेषण*

## परिशिष्ट 2.6

**(संदर्भ: परिच्छेद 2.4.8 आणि आलेख 2.5)**

**इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत विद्यार्थी/महाविद्यालयांच्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम हस्तांतरित करण्यास लागलेला कालावधी**

(₹ कोटीमध्ये)

| संचय खात्यात जमा होण्याचे वर्ष | विद्यार्थी/महाविद्यालय यांच्या खात्यात शिष्यवृत्ती हस्तांतरीत होण्यास लागलेला कालावधी | | | | | | | | व्यवहारांची एकूण संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 महिन्यापर्यंत | | > 1-3 महिने | | > 3-6 महिने | | > 6 महिने | | | |
| | व्यवहारांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | व्यवहारांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | व्यवहारांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | व्यवहारांची संख्या | पहिल्या हप्त्याची रक्कम | | |
| **इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत विद्यार्थी/महाविद्यालयांच्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम हस्तांतरित करण्यास लागलेला कालावधी** | | | | | | | | | | |
| 2018-19 | 85192 | 42.82 | 198061 | 77.62 | 6607 | 1.21 | 8441 | 0.93 | 298301 | 122.58 |
| 2019-20 | 173632 | 120.59 | 9657 | 3.36 | 4097 | 0.55 | 10073 | 1.66 | 197459 | 126.16 |
| 2020-21 | 57086 | 15.69 | 3299 | 0.47 | 1055 | 0.21 | 2304 | 0.28 | 63744 | 16.65 |
| 2021-22 | 33689 | 19.65 | 36524 | 17.8 | 124 | 0.07 | | | 70337 | 37.52 |
| **एकूण** | **349599** | **198.75** | **247541** | **99.25** | **11883** | **2.04** | **20818** | **2.87** | **629841** | **302.91** |
| **विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अंतर्गत विद्यार्थी/महाविद्यालयांच्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम हस्तांतरित करण्यास लागलेला कालावधी** | | | | | | | | | | |
| 2018-19 | 41034 | 49.92 | 57176 | 28.39 | 12948 | 2.68 | 4459 | 0.54 | 115617 | 81.53 |
| 2019-20 | 131946 | 157.06 | 26006 | 11.93 | 1153 | 0.23 | 8184 | 1.57 | 167289 | 170.79 |
| 2020-21 | 50950 | 24.02 | 7238 | 5.27 | 963 | 0.38 | 181 | 0.03 | 59332 | 29.70 |
| 2021-22 | 46276 | 53.10 | 5288 | 3.68 | 13 | 0.0019 | | | 51577 | 56.78 |
| **एकूण** | **270206** | **284.10** | **95708** | **49.27** | **15077** | **3.2919** | **12824** | **2.14** | **393815** | **338.80** |

*स्त्रोत: महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्याकडून प्राप्त केलेल्या माहितीचे विश्लेषण*

### परिशिष्ट 2.7
### (संदर्भ: परिच्छेद 2.4.8 आणि आलेख 2.6)
### इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे शैक्षणिक वर्षासाठीचे प्रदान पुढील वर्षात विभागले

(₹ कोटीमध्ये)

| शैक्षणिक वर्ष | प्रदान जमा होण्याचे वर्ष | | | | | | | | व्यवहारांची एकूण संख्या | प्रदानाची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2018-19 | | 2019-20 | | 2020-21 | | 2021-22 | | | |
| | व्यवहारांची संख्या | प्रदानाची रक्कम | व्यवहारांची संख्या | प्रदानाची रक्कम | व्यवहारांची संख्या | प्रदानाची रक्कम | व्यवहारांची संख्या | प्रदानाची रक्कम | | |
| इतर मागासवर्गीयांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या शैक्षणिक वर्षासाठीचे प्रदान पुढील वर्षात विभागले | | | | | | | | | | |
| 2018-19 | 2,02,296 | 97.19 | 1,32,711 | 44.05 | 7,127 | 0.83 | | | 3,42,134 | 142.07 |
| 2019-20 | | | 1,43,931 | 104.29 | 71,275 | 18.70 | 2,794 | 0.56 | 2,18,000 | 123.55 |
| 2020-21 | | | | | | | 69,707 | 37.3 | 69,707 | 37.3 |
| **एकूण** | **2,02,296** | **97.19** | **2,76,642** | **148.34** | **78,402** | **19.53** | **72,501** | **37.86** | **6,29,841** | **302.92** |
| विमुक्त जाती भटक्या जमातींना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे शैक्षणिक वर्षासाठीचे प्रदान पुढील वर्षात विभागले | | | | | | | | | | |
| 2018-19 | 86,040 | 74.69 | 85,502 | 64.45 | 3,598 | 0.54 | | | 1,75,140 | 139.68 |
| 2019-20 | | | 1,01,070 | 110.04 | 63,087 | 31.59 | 3,510 | 0.89 | 1,67,667 | 142.52 |
| 2020-21 | | | | | | | 51,008 | 56.61 | 51,008 | 56.61 |
| **एकूण** | **86,040** | **74.69** | **1,86,572** | **174.49** | **66,685** | **32.13** | **54,518** | **57.5** | **3,93,815** | **338.81** |

*स्त्रोत: महाराष्ट्र इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्याकडून प्राप्त केलेल्या माहितीचे विश्लेषण*

©
भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
https://cag.gov.in

https://cag.gov.in/ag/Mumbai-i/hi